ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**सप्टेंबर २००८**
**वर्ष २८ वे, अंक ९ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
मुखपृष्ठ : **गिरीश कुळकर्णी**

**रुची – वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@yahoo.com
granthali01@rediffmail.com
marathividyapeeth@rediffmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

'रुची' दिवाळी अंकाची तयारी जोरात चालू आहे, अशा बेताला गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकाचे कौतुक करणारे एका वाचकाचे पत्र आले आहे. त्याला सर्क्युलेटिंग लायब्ररीमधून तो अंक अलिकडे उपलब्ध झाला. त्यामुळे अर्थातच आमची उमेद वाढली आहे. या वर्षीचा दिवाळी अंक ऑक्टोबरअखेर प्रसिद्ध होईल. त्याचे संपादन कवयित्री अंजली कुळकर्णी करत आहे. दिवाळी ऑक्टोबर शेवटी आहे. दिवाळी अंक २२ ऑक्टोबरच्या बेतास प्रसिद्ध करण्याचे मानस आहे. त्यामुळे ऑक्टोबरचा अंक ऑक्टोबर–नोव्हेंबर जोड अंक असेल. नियमित पुढील अंक १० डिसेंबरला प्रसिद्ध होईल.

शिक्षकदिन नुकताच साजरा झाला. त्याचे निमित्त ठेवून ठाण्यात शिक्षकांनी 'व्यासपीठ' नावाचा एक उपक्रम अलिकडेच सुरू केला, त्याची माहिती दिली आहे. 'ग्रंथाली'ने राम जोशी, लीला पाटील, रमेश पानसे, अरविंद वैद्य, भाऊ गावंडे अशांची शिक्षणविषयक पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. गतवर्षी हेरंब कुळकर्णीचे 'शाळा आहे–शिक्षण नाही' हे पुस्तक प्रसिद्ध करताना शिक्षकांच्या 'नेटवर्क'ला चालना देण्याचा कार्यक्रम जाहीर केला. तो त्यावेळी मूळ धरू शकला नाही. शिक्षणाचा प्रसार होत आहे, त्याबरोबर गुणवत्तेची कास धरणारा वर्गही तयार होत आहे, ही मोठी आशेची गोष्ट आहे. या घटनेचा सर्व संवेदनाशील व विचारी मंडळींनी पुरस्कार करायला हवा.

अंकामध्ये 'अमेरिकेतून' या सदराखाली विजय जोशी वेगळ्या जगातले काही लेखन आपल्यासमोर सादर करणार आहेत. त्यांचे 'विचारवेध' या नावाचे तीन संग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहेत. त्यातून पाश्चात्य जगातील विचारसंकल्पनांचा परिचय करून देण्यात आला आहे. ज्यांनी ती पुस्तके पाहिली असतील त्यांना जोशी यांच्या सखोल विचारचिंतनाची कल्पना आली असेल. त्यांच्या या नियमित पण वेगळ्या लेखनाबद्दल औत्सुक्य आहे.

चुनेकर यांचे 'भाषाभान' व्यापक होत आहे व त्याचबरोबर वाचकांना ओढही लावत आहे हे मिळणाऱ्या प्रतिसादावरून जाणवते.

समकालीन सामाजिक–सांस्कृतिक विषयांवरील विचारवेधक लेखन 'रुची'त प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न राहिला आहे. वाचकांच्या प्रतिक्रियेबद्दल सतत उत्सुकता असते.

**– संपादक**

## अनुक्रम

- **शिक्षणातून स्व–विकास**/२
- **गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निरंतर..**/अमृता परांजपे/३
- **परीक्षेचा संसर्गरोग**/अविनाश बर्वे/६
- **शिक्षण 'सेवे'चा नवा अर्थ**/८
- **सहनशीलते, तुला सलाम!**/श्याम जोशी/९
- **एकुलत्या एका मुलाचा अपघाती मृत्यू**/विजय वि. जोशी/१२
- **एक असामान्य सावरकरभक्त**/पद्मा कऱ्हाडे/१४
- **भाषेचा संस्कार : 'कळत–नकळत'ही**/जयवंत चुनेकर/१६
- **'डायरी'मधून कॅन्सरचा शोध**/डॉ. सुनंदा चावजी/१९
- **साहित्य वाचून मी घडलो!– राजदत्त**/२२

# शिक्षणातून स्व-विकास

आदिम काळात शिक्षण ज्ञात माहिती आणि कौशल्यांपुरते मर्यादित होते. त्यांचे संक्रमण एका व्यक्ती–कडून दुसऱ्या व्यक्तीकडे होत असे. पुढे ज्ञानाचा विस्तार होत गेला, तसतशी ज्ञानसंक्रमणाची केंद्रे घर, समाज अशी बदलत गेली. यथावकाश गुरुकुल व्यवस्था अस्तित्वात आली. परंतु त्या काळात अशा प्रकारे हेतुपुरस्सर ज्ञानार्जन हा ऐच्छिक भाग होता. ब्रिटिश काळात औपचारिक शिक्षणाचा आरंभ झाला. शिक्षणाचा विस्तार होऊ लागला आणि प्रसारही. तरीही शिक्षण संपूर्ण भारतीय समाजासाठी अत्यावश्यक बाब मानली जात नव्हती. मात्र स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि इतर मूल्ये ध्येयवादी शिक्षकां–कडून जरूर संक्रमित होत होती.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा विस्तार झाला आणि त्याचबरोबर शिक्षित वर्गही वाढला. राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. त्याचबरोबर देशाच्या विकासात अनेक प्रवाह, उपप्रवाह सामील होत होते. त्या सर्वांचा एकमेकांवर परिणाम होणे अपरिहार्य होते, पण त्यामुळे एकूणच शिक्षणक्षेत्रामध्ये काही दोष निर्माण झाले.

वर्तमानस्थितीचे चित्र पाहिले, तर असे दिसून येते, की ध्येयप्रेरित शिक्षक मागे पडून शिक्षकी पेशाकडे अनेक जण केवळ उपजीविकेचे साधन म्हणून पाहत आहेत. शिक्षण अनिवार्य केले गेल्यामुळे शिक्षण–क्षेत्राकडे धंदा म्हणून बघणाऱ्यांची संख्या वाढली आहे. शासकीय धोरणांच्या ठरावीक चौकटींमध्ये प्रत्यक्ष शिक्षणापेक्षा आणि शैक्षणिक विकासापेक्षा कागदी घोड्यांना महत्त्व आले आहे. आनंददायी शिक्षण–प्रवाहाचा गुणदायी परीक्षा पद्धतीत लोप झाला आहे. शिक्षण, मनोविकास, कौशल्यप्राप्ती, रसास्वाद, जीवनानंद हे शब्द कुचकामी ठरून ड्रिल वर्क, हाय पोस्ट, फॅट सॅलरी ह्यांना महत्त्व आले आहे.

'हे असे आहे तरी पण हे असे असणार नाही' असे मानणाऱ्यांचा एक वर्ग असतो. शासनाची मदत, अनुदान, वेतन, मोबदला, मानधन, सेवाभावी संस्थांचा आधार यांपैकी कशाचीही वाट न पाहता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून रचनात्मक स्वप्ने पाहणारे हे लोक असतात. स्वयंविकासाची समाज–विकासाशी सांगड घालणे ही त्यांची अंत:प्रेरणा असते. आपापल्या कुवतीनुसार आपापल्या परिसरात, आपल्या शाळेत, आपल्या वर्गात ते काही ना काही करत असतात. 'व्यासपीठ'चा प्रयत्न या विखुर–लेल्या प्रकाशकणांना एकत्र आणण्याचा आहे.

अशा एकत्र येण्यातून 'व्यासपीठ'द्वारे सर्वांना आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी एक जागा मिळेल. आपल्या प्रयत्नांना अडथळा झाला किंवा प्रयत्न अयशस्वी झाले, तरी मनाची होणारी घुसमट थांबेल. इतरांकडून नवनवीन कल्पना मिळतील. अनुभवांची देवाणघेवाण होईल. स्वत:मधल्या त्रुटी, इतरांचे गुणविशेष अनौपचारिक रीत्या कळल्याने सुधारणेच्या दिशेने पाऊल टाकता येईल. यातून वैयक्तिक मर्यादा दूर होतील. स्वत:च्या सकारात्मक शैक्षणिक प्रयत्नां–विषयी आत्मविश्वास वाटेल. कदाचित, उदासीन असणाऱ्यांच्या मनातील मरगळ झटकली जाईल. चांगुलपणाची शक्ती विखुरल्यामुळे अशक्त होते; ती एकत्र आल्यामुळे तरारून उठेल. याचा शिक्षण–क्षेत्राला निश्चितच फायदा होईल. 'व्यासपीठ' शिक्षणाच्या नव्या दिशा समजून घेईल, शिक्षणक्षेत्राचा विस्तार जाणून घेईल, शिक्षणक्षेत्रात वाहणारे शैक्षणिक व्यवस्थापन, आंतरराष्ट्रीय दर्जा, गुणांकन यांसारखे वारे समजून घेईल. त्यामधून शिक्षक व विद्यार्थी या दोघांचाही विकास घडेल. शिक्षण–क्षेत्राशी संबंधित कोणतीही गोष्ट 'व्यासपीठ'–ला वर्ज्य असणार नाही. त्याचप्रमाणे शिक्षकां–सह पालक, निवृत्त शिक्षक आणि शिक्षणप्रेमी या सर्वांचे 'व्यासपीठ' स्वागतच करेल.

संपूर्ण वर्षभर 'व्यासपीठ' वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम व उपक्रम करेल. 'प्रेरणा–प्रबोधन–प्रयत्न' या त्रिसूत्रीचा 'गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निरंतर' 'व्यासपीठ'ने अंगिकार केलेला आहे. वेतनवाढ, इतर हक्क व सवलती, नियम इत्यादीसाठी संघर्ष करण्या–करता शिक्षक संघटना तत्पर असल्यामुळे तत्सम कार्यक्रम 'व्यासपीठ' करणार नाही. 'शिक्षणातून स्व–विकास' हे 'व्यासपीठ'चे ध्येय आहे.


## 'ग्रंथाली'कडील शिक्षणविषयक पुस्तके

**शाळा आहे शिक्षण नाही!**
हेरंब कुलकर्णी
*मूल्य १०० रु.*

**प्रकाशच्या उंबरठ्यावर**
भाऊ गावंडे
*मूल्य १०० रु.*

**विज्ञानशिक्षण – नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान

**का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने
*मूल्य ५० रु.*

**शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे
*मूल्य २०० रु.*

संपर्क : ग्रंथाली, म्युनिसिपल स्कूल इमारत,
पहिला मजला, टोपीवाला लेन,
डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
फोन : २३८९ २४ ४५/ २३८७५४८१

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निरंतर... प्रेरणा, प्रबोधन, प्रयत्न

**अमृता परांजपे**

शीर्षक पाहिल्यावरच सूज्ञ वाचकांस 'अधिक सांगणे न लगे.'

पण तरीही 'व्यासपीठ' म्हणजे नेमके काय? सुरू करण्यामागचा हेतू कोणता, कल्पना कोणाची हे वाचकांपुढे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

शिक्षकांच्या नावाने समाजात कितीही ओरड होत असली, सर्व दोष त्यांच्याच माथी मारले जात असले तरीही सच्चा शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसाठी झटत असतो. फक्त झटणारे शिक्षक आपल्या परिसरातील शिक्षकांशिवाय इतर कोणाच्या ओळखीचे नसतात.

शिक्षकांनी एकत्र यावे, भेटावे, चर्चा करावी, कल्पनांची देवाणघेवाण करावी, त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करावा यासाठी पुढाकार घेतला तो सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे येथील एक शिक्षणप्रेमी, विद्यार्थीप्रेमी सुरेश जंगलेसर यांनी.

त्यांनी आपली कल्पना मांडली ती सुद्धा निवृत्त झाल्यानंतरदेखील विद्यार्थ्यांसाठी सतत धडपडणाऱ्या अविनाश व नंदिनी बर्वे या दांपत्यासमोर. उत्तम कल्पनेला दाद द्यायची आणि ताबडतोब कार्यवाही सुरू करायची ही त्या दोघांची खासीयत.

जंगलेसरांना सहकार्य मिळाले ते त्यांच्याच शाळेतील अस्मिता आंबेकर, भागवत, थिराणी हायस्कूलच्या धारडेबाई, शिवसमर्थ विद्यालयाच्या देसाईबाई, ब्राह्मण शिक्षण मंडळाचे विश्वस्त श्रीधर गांगल यांचे.

'व्यासपीठ'ची माहिती सर्व शिक्षकांना, शिक्षणप्रेमींना प्रसृत करून पहिली सभा झाली ती धारडेबाईंकडे. तेथे ठरल्याप्रमाणे उद्‌घाटनाचा कार्यक्रम रविवार २० जुलै २००८ रोजी दुपारी चार वाजता झाला. स्थळ ठरले 'ब्राह्मण शिक्षण मंडळ' इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा हॉल. श्रीधर गांगल हे तेथे विश्वस्त असल्याने ते आम्हाला नेहमीच सक्रिय पाठिंबा देतात.

सर्व शाळांमध्ये, शिक्षणप्रेमींना कार्यक्रमाचे आमंत्रण दिले, ए.के.जोशी शाळेच्या संगीतशिक्षिका वीणा जोशी यांनी.

वीस जुलैला रविवार असूनदेखील शिक्षक आणि शिक्षणप्रेमींची कार्यक्रमाला गर्दी झाली होती. शिक्षकांची स्पर्धा व उद्‌घाटन असा कार्यक्रम होता.

कार्यक्रमाला उद्‌घाटक म्हणून लाभले होते दाऊद दळवीसर (निवृत्त प्राचार्य, ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे). इतर मान्यवरांमध्ये होते अशोक चिटणीस (निवृत्त मुख्याध्यापक, डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे), सुहासिनी कुलकर्णी (निवृत्त मुख्याध्यापक, योजना विद्यालय, बोरिवली), मेहेंदळेसर (निवृत्त मुख्याध्यापक, महाराष्ट्र विद्यालय, ठाणे), संजय केळकर (आमदार, पदवीधर मतदारसंघ, कोकण विभाग), बोरवणकर (ब्राह्मण शिक्षण मंडळाचे विश्वस्त).

इतर उपस्थित ज्येष्ठ मंडळींमध्ये प्रा. शुभा चिटणीस, प्रा. अनंत देशमुख, 'जिज्ञासा'चे सुरेंद्र व सुमिता दिघे, ज्ञानप्रसारिणी, कळवाच्या मुख्याध्यापक पातकर इत्यादी मान्यवर होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून न्यू इंग्लिश स्कूल, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापक नायर व सरस्वती सेकंडरी स्कूलचे पर्यवेक्षक एकनाथ तेली यांनी काम पाहिले.

पुढील स्पर्धकांनी प्रकल्प सादर केले :

**लाड** यांनी नकाशावाचनावर आधारित प्रकल्प सादर केला. भूगोलातील नकाशा-वाचन हा भाग विद्यार्थ्यांना अवघड जातो. त्यासाठी त्यांनी भारताचा छोटा नकाशा काढला आणि तेथील वैशिष्ट्ये वेगवेगळ्या रंगांच्या मातीने दाखवली. डोंगराळ भागासाठी तशाच रंगाची माती, नद्या दाखवायला निळा रंग, सुपीक भाग दाखवण्यासाठी हिरव्या रंगाची माती अशा प्रकारे दाखवल्यामुळे मुलांना ते जास्त चांगल्या प्रकारे लक्षात राहिले. 'फिजिकल मॅप ऑफ इंडिया' असे नाव त्यांनी दिले.

मी **अमृता परांजपे** (शिशु ज्ञानमंदिर प्राय. शाळा, ठाणे). माझ्या प्रकल्पाचे नाव 'क्रमिक पुस्तकांखेरीज अवांतर वाचन करण्याची व चांगल्या कार्यक्रमांचा (मुलाखती, कथाकथन, काव्यवाचन इत्यादी) आस्वाद घेण्याची विद्यार्थ्यांना सवय लावणे. मुलांना अगोदर वर्तमानपत्र वाचण्याची सवय लावली व त्यानंतर 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत प्रकल्प करून घेतले. डॉ. आनंद नाडकर्णींच्या आय.पी.एच. संस्थेतर्फे होणाऱ्या 'वेध'च्या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांना नेले. त्यानंतर 'ग्रंथाली'तर्फे होणाऱ्या स्पर्धांत भाग सातत्याने घेतल्याने मुलांच्यात चांगली पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. या मुलांची 'आमचा बाप आन् आम्ही', 'गोष्टी माणसांच्या', 'वडीलधारी माणसे', 'बेवड' अशी पुस्तके वाचून झाली आहेत.

**रेखा वाघ** ह्यांच्या प्रकल्पाचे नाव 'ह्युमन लाईफ' असे होते. त्यांनी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांचे पाच-सहा मुलांचा एक असे गट तयार करून चित्रे, तक्ते, मॉडेल्सच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना विषय शिकवला.

**शैला भुते** (श्रीराम विद्यामंदिर) - इयत्ता आठवीच्या इंग्रजीतील पहिल्या

युनिटसाठी इंग्रजी शब्दकोश तयार केला. शब्दांचे उच्चार सुधारणे, शब्दसंपदा वाढवणे, विशेषणे तयार करता येणे हे सर्व शाब्दिक खेळांतून घेतल्यामुळे मुलांना इंग्रजी विषयात गोडी वाटू लागली.

**कैलास जैन** (शारदा विद्यामंदिर) – 'गणित' विषयाचा निकाल वाढवण्यासाठी एक प्रयोग. शालांत परीक्षेचा निकाल कमी लागतो तो बऱ्याच वेळा गणितामुळे. सरांच्या शाळेतील काही विद्यार्थी घरातील आर्थिक भार पेलणारे आहेत व त्यांचे पालकही शिकलेले नाहीत. त्यामुळे घरात अभ्यासाचे वातावरण नाही. त्यामुळेच या मुलांच्या गणिताच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट झालेल्या नसतात. म्हणून त्यांनी संख्यारेषेवरून बेरीज-वजाबाकी या संकल्पना स्पष्ट केल्या. त्यासाठी त्यांनी मुलांचे गट केले. त्यांना वेगवेगळी उदाहरणे सोडवायला दिली. त्यामुळे मुलांना गणितात गोडी निर्माण झाली.

**रमा नेने** (ज्ञानप्रसारिणी, कळवा) यांचा प्रकल्प पर्यावरणावर आधारित असा होता. त्यांच्या वाचनात 'शून्य कचरा मोहीम – एक स्वप्न' हे पुस्तक आले आणि त्यांना त्यापासून प्रेरणा मिळाली. त्यांनी तो प्रकल्प स्वत:च्या घरात राबवला व नंतर शाळेत राबवला. मुलांना दिशा दाखवली की मुले सहकार्य करतात. मुलांनी शाळेत इतस्तत: पडलेले कागद एकत्र केले व त्यांची रद्दी तयार करून ते विकले. ओल्या कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती केली. शाळेतील विद्यार्थी घरोघरी जाऊन लोकांना पाणी वाचवण्या-विषयी विनंती करतात. शाळेत वृक्षारोपणाचे कामही मुले करतात. शाळेत 'झिरो गार्बेज' प्रकल्प राबवला जात आहे.

**निशा लौंघानी** (न्यू इंग्लिश स्कूल, इंग्रजी माध्यम) – दहावीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी (प्रथम भाषा)मधील वाचन, श्रवण, भाषणक्षमता वाढवणे. यंदा प्रथमच शालांत परीक्षेला विद्यार्थ्यांच्या चारही भाषांच्या तोंडी परीक्षेला सुरुवात झाली. मुलांना त्या विशिष्ट भाषेत विचार करता व तो मांडता आला पाहिजे, बाहेरील परिच्छेदांचे अर्थपूर्ण वाचन करता आले पाहिजे यासाठी सराव घेतला.

**निरंजन भागवत** (शिवसमर्थ विद्यालय, ठाणे) – 'विज्ञानशिक्षणातून मूल्यशिक्षण' हा यांचा प्रकल्प होता. मूल्यशिक्षण हा विषय अभ्यासक्रमात नाही. कारण अपेक्षा अशी आहे की शिक्षकांनी तो आपल्या विषयामधूनच शिकवावा. 'पोटॅशिअम परमँगनेट पाण्यात विरघळते व पाण्याचा रंग बदलतो' हा प्रयोग दाखवताना सरांनी दोन स्फटिक पाण्यात घातले. पाण्याचा रंग हवा तेवढा बदलल्याने मुलांना लगेच लक्षात आले, की कमीत कमी साहित्य वापरूनही प्रयोग योग्य पद्धतीने करता येतो.

**नमिता जोशी** (ए.के. जोशी, इंग्रजी माध्यम, ठाणे) भूमितीसाठी 'टीचिंग एड'. भूमितीच्या संकल्पना (त्रिकोण, चौकोन, काटकोन, विशालकोन, लघुकोन इत्यादी) स्पष्ट करण्यासाठी त्यांनी छोट्या लांबीची लाकडी पट्टी घेतली. दोन खिळयांच्या साहाय्याने तिच्या दोन्ही टोकांना रंगीत लाकडाच्या चार-चार पट्ट्या जोडल्या. त्या हलू शकत होत्या व त्यांनी त्यांच्या आधाराने भराभर सगळे आकार प्रत्यक्ष करून दाखवले.

**सुषमा पांढरीपांडे** (वर्तकनगर माध्यमिक विद्यालय, ठाणे) – 'विज्ञान-शिक्षणातून जीवनशिक्षण'. विज्ञानविषय शिकवताना जीवनशिक्षणाकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे. कारण मुलांना फक्त पुस्तकी किडा बनवायचे नाही. म्हणून त्यांनी पावसाळा सुरू झाल्यावर मुलांना सांगितले की आपल्या शेजारच्या पाच घरी जायचे आणि कोणाला कोणता आजार झाला आहे का, त्या आजाराचे नाव, डॉक्टरांनी कोणती औषधे दिली हे विचारून लिहून आणायचे. त्या निमित्ताने मुलांना निरनिराळ्या आजारांची नावे, हे आजार होतात कधी-कशामुळे त्यावरील औषधांची नावे ही माहिती समजली.




# हॅरिसबाई

**कृ.ना. कुडाळकर**

हॅरिसबाईच्या मनात एक स्वप्न जागे होते –
पॅरिसला जाऊन एक मौल्यवान वस्तू विकत घेण्याचे
त्यानंतर जी धमाल घडते त्याचे चित्र म्हणजे हॅरिसबाई

**किंमत १२० रुपये**

**सवलतीत ७० रुपये (घरपोच ९० रुपये)**

**सारंगसर** (माजीवडा हायस्कूल, माजीवडा) - 'हस्ताक्षर-सुधार प्रकल्प' इयत्ता पाचवी ते सातवी व इयत्ता आठवी ते दहावी असे प्रत्येकी चार-पाच मुलांचे गट करायचे. मुलांना या प्रकल्पात रस असला पाहिजे. वाळू, माती यांत बोटाने अक्षरे गिरवता येतील. पेन, पेन्सील, बोरू यांनीही अक्षरे गिरवता येतील. अक्षर सुधारलेली मुले पुढील विद्यार्थ्यांचा गट तयार करून त्यांना शिकवतील. असे करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारू शकेल.

उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात 'व्यासपीठ' गीताने झाली. गीत लिहिले होते अविनाश बर्वेसरांनी, गायिका वीणा जोशी व त्यांना तबल्यावर साथ दिली त्यांचा मुलगा मयुरेश जोशी याने.

जंगलेसरांनी 'व्यासपीठ' स्थापनेमागचा हेतू स्पष्ट केला. शिक्षक-विद्यार्थी, सर्वांनाच समस्या असतात. शिवाय जीवनशैली बदलत असल्याने अनेक नवीन आव्हाने समोर येत आहेत, नवनवीन विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात होत आहे, या सगळ्याला प्रथम सामोरे जावे लागते ते शिक्षकाला. त्याला त्याचा विद्यार्थी घडवायचा असतो. नवीन पिढी सक्षम करायची असते. मग अशा सर्व-म्हणजे प्राथमिक, माध्यमिक, खाजगी, सरकारी सर्व-शिक्षकांनी एकत्र येऊन जर संवाद साधला तर समस्यांचे निराकरण होऊ शकेल. यासाठी ज्या ज्या शिक्षकांसमोर हा विचार मांडला ते प्रत्येकजण सहकार्य करायला तयार झाले आणि त्यातून उभे राहिले ते 'व्यासपीठ'.

यापुढील कार्यक्रम म्हणजे बक्षिसे जाहीर झाली. प्रथम क्रमांक - नमिता जोशी (ए.के. जोशी, इंग्रजी माध्यम), द्वितीय क्रमांक - रमा नेने (ज्ञानप्रसारिणी, कळवा), तृतीय (विभागून) - लौंघानी (न्यू इंग्लिश स्कूल, इंग्रजी माध्यम) व अमृता परांजपे (शिशु ज्ञानमंदिर, प्राथमिक शाळा)

कै. दिलीप महाजन यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दिला जाणारा 'विद्याव्रती' पुरस्कार अस्मिता भागवत (सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे) व धारडे (थिराणी हायस्कूल, ठाणे) यांना मिळाला. त्याबद्दल त्या दोघींचेही सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटक दळवीसर यांची ओळख खोल्लमसरांनी करून दिली.

दळवीसर हे ज्ञानसाधना कॉलेजचे निवृत्त प्राचार्य. लोकप्रिय, समाजसेवेची आवड तर फोटोग्राफीचा छंद. त्यांनी मंदिरे, शिल्पे यांच्या स्लाईड आदिवासी मुलांपर्यंत पोचवल्या आहेत. त्यांचे 'महाराष्ट्रातील लेणी' हे पुस्तक प्रसिद्ध आहे.

मान्यवरांनी आपापल्या छोटेखानी भाषणांतून व्यासपीठाला शुभेच्छा दिल्या.

**अशोक चिटणीस** - आजही समाजात लोकांचा चांगुल-पणावर विश्वास आहे. जिथे चांगले घडत असते तेथे लोक गर्दी करतातच. शिक्षकांच्या अशा सभा व्हायला हव्यात.

विनोबा भावे म्हणत की 'विद्यार्थी हा देवासारखा असतो.' देवाला आपण शिळा नैवेद्य दाखवत नाही, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यालाही शिळे ज्ञान देऊन चालणार नाही. ते ताजे हवे. म्हणून शिक्षकांच्या विचारांचे आदानप्रदान व्हायला हवे.

**संजय केळकर** - 'व्यासपीठ : प्रेरणा, प्रबोधन, प्रयत्न' हे नावच एवढे बोलके आहे की पुढे कशा स्वरूपाचे काम चालेल हे त्यावरून लक्षात येते.

**सुहासिनी कुलकर्णी** - राष्ट्र सेवादलाशी बराच काळ संबंध असलेल्या. या कार्यक्रमासाठी दादरहून खास आल्या होत्या, ते सर्वांचे कौतुक करण्यासाठी. कारण सर्व शिक्षक आपापल्या परीने विद्यार्थ्याला पुढे आणण्यासाठी झटत असतात. पण जुने अनुभवी शिक्षक आणि नवीन उत्साही शिक्षक यांचा जर संगम झाला तर शिक्षणात आणखी प्रगती होईल. इथे जमलेले सर्व शिक्षक एका अंत:प्रेरणेने एकत्र आलेले आहेत, म्हणून त्यांचे कौतुक. ह्या सर्व नव्या-जुन्यांचा संगम होऊन एका चांगली चळवळ उभी राहवी अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

**मेहेंदळेसर** - पूर्वी आमचे 'मुख्याध्यापक परस्पर सहकार मंडळ' होते. आम्ही पुस्तके वाचून त्यावर चर्चा करायचो. आपण शिक्षकही एकत्र यायला हवेच होतात, आता विद्यार्थ्यांकरता वेगवेगळे उपक्रम, चर्चा करून ठरवा व तसे ते राबवा.

**बोरवणकर** - माझ्याकडे भरपूर इंग्रजी ग्रंथसंग्रह आहे. आपण अभ्यासासाठी केव्हाही माझ्याकडून पुस्तके न्या.

**अनंत देशमुख** - बर्वे पती-पत्नींचे कौतुक करताना त्यांनी शिक्षकांच्या सृजनशीलतेचेही कौतुक केले. ज्या शिक्षकांनी प्रकल्प सादर केले त्या प्रत्येकाचा विषय वेगळा होता.

हेरंब कुलकर्णी - (पत्ररूपाने) - प्रत्यक्ष उपस्थित राहू शकलो नसलो तरी मनाने मात्र मी आपल्यात आहे. कार्यक्रमाला आणि व्यासपीठाला माझ्या मनापासून शुभेच्छा.

जागतिकीकरण झाले आहे, ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत, विद्यार्थी संवेदनशील आहेत, त्यांच्या ह्या वयात नवीन ज्ञान देणे गरजेचे आहे, अशा वेळी आपण एकत्र येत आहात म्हणून शुभेच्छा.

**दाऊद दळवीसर** - 'माझा शिक्षकांबद्दल गैरसमज होता, पण आता निरनिराळे राबवलेले प्रकल्प ऐकले तेव्हा खात्री पटली, की विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे.' हाच धागा पुढे पकडून त्यांनी समाधान व्यक्त केले, की असे सगळे ध्येयवादी, आशावादी शिक्षक 'व्यासपीठ'मुळे एकत्र आले आहेत. 'ठाणे हे विद्येचे माहेरघरच आहे' हे आता आणखी स्पष्टपणाने सर्वांच्या समोर येईल.

---

**अमृता परांजपे**
**फोन : २५४०७१८६**

# परीक्षेचा संसर्गरोग

अविनाश बर्वे

शिक्षणाचा विस्तार झाला. शिक्षण अनिवार्य झाले. गेल्या दोन दशकांत विद्यार्थ्यांची संख्यात्मक वाढ मोठ्या प्रमाणात झाली. पूर्वी ज्या छोट्या गावांत प्राथमिक शिक्षणाचीही सुविधा नव्हती त्या गावांत माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा सुरू झाल्या व काही ठिकाणी महाविद्यालयेही निघाली.

पन्नास–पाऊणशे वर्षांपूर्वी शिक्षण–संस्था काढण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. समाज शिक्षित करावा, देशास उत्तम–चारित्र्यवान नागरिक द्यावेत असा हेतू ठेवून समाजातील ध्येयवादी व्यक्तींनी–व्यक्ति–समूहांनी, कोणतीही आर्थिक अनुकूलता नसताना शाळा सुरू केल्या. त्याग, समाजप्रेम, देशप्रेम ही त्यांच्याजवळील मुख्य सामग्री होती. शिक्षकांचे वेतन देता यावे यासाठी पत्नींच्या अंगावरील दागिने मोडणारी ती मंडळी होती.

दोन–अडीच दशकांत चित्र बदलले. शिक्षणातील लाभाची चाहूल राजकारणातील चलाख मंडळींना फार लवकर लागली. स्वत:चे राजकारणात स्थान निर्माण करणे व बेहिशेबी, अमर्याद संपत्ती गोळा करण्याचे साधन म्हणजे शिक्षणसंस्था, हा संदेश देशातील कानाकोपऱ्यात पोचला व अनेक शिक्षण–सम्राट उदयाला आले.

हजारो–लाखो शाळांसाठी मोठ्या प्रमाणात शिक्षकांची गरज निर्माण झाली. प्रचंड लोकसंख्येत या मनुष्यबळाची वाण असण्याचेही कारण नव्हते. रोजगाराच्या भीषण समस्येमुळे शिक्षक होण्यासाठी उत्सुक लाखो रांगेत उभे होते, आहेत. पंचवीस–तीस वर्षांपूर्वी डी.एड., बी.एड.ला प्रवेश ही सहज होणारी गोष्ट होती. पण एखाद्या धंद्याला 'तेजी' आली की त्यांतील सर्व घटकांना तेजी येते. डी.एड., बी.एड. महाविद्यालये मिळवणाऱ्यांची चांदी झाली.

मोठ्या देणग्या (पावतीसह किंवा विना) देऊन डी.एड., बी.एड.ची प्रमाणपत्रे घेऊन निघालेली मंडळी पुन्हा यथाशक्य पैसे देऊन नोकऱ्यांत शिरली. सरळ मार्गाने पदव्या घेतलेली, नोकरीत दाखल झालेली मंडळी त्यात होती व आहेत.

संख्यात्मक विकास होतो तेव्हा गुणात्मक विकासाची फार अपेक्षा–लगेच तरी नक्कीच ठेवता येत नाही.

विद्यार्थ्यांची संख्या, शाळांची संख्या, शिक्षकांची संख्या, या क्षेत्रात कार्यरत मंडळी हा जसा शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम करणारा घटक आहे, त्यानुसार 'शैक्षणिक धोरण' हा महत्त्वाचा घटक होय. गुणवत्तेच्या घसरणीतील अनेक घटकांपैकी शासननिर्मित शिक्षणव्यवस्था हा महत्त्वाचा घटक! राष्ट्र जडणघडणीत शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा घटक हे खरे, पण प्रत्यक्ष शासनव्यवस्थेत 'शिक्षण' हा अग्रक्रमात सर्वात खालचा घटक. त्यामुळे शिक्षणयंत्रणेत अनिश्चितता, अनास्था निर्माण झाली.

१० + २ + ३ आकृतिबंधाचा प्रारंभ हा गुणवत्तेच्या घसरणीचा आरंभ म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. 'विषयाची निवड' व 'भरपूर पर्याय' हे प्रगत शिक्षण–पद्धतीचे मुख्य लक्षण असायला हवे. तिथे १९७५ साली 'हे सात विषयच अनिवार्य' हा निर्णय झाला. छोटी गावे, छोटे व्यवसाय यांत प्रवेश करणारे बहुसंख्य असणार. त्यांना इंग्रजी, गणित अनिवार्य असण्याचे कारण नव्हते, पण 'दर्जेदार' शिक्षणाच्या कल्पना मनात असणाऱ्या 'विद्वानांनी' तेच कसे योग्य आहे याचे समर्थन केले. कार्यानुभव, समाजसेवा विषयांची स्थिती पूर्वीच्या 'सूतकताई'च्या पातळीवर येण्यास मुळीच वेळ लागला नाही. प्रत्यक्ष शिक्षणापेक्षा 'रकाने भरा' हा संदेश न देता सर्वत्र पोचला.

मुळात या विषयाच्या योजनेमागील हेतू चांगला होता, पण साधनसुविधा, प्रशिक्षित व्यक्ती व मुख्य म्हणजे त्यातील व्यवहार्यता यांचा विचार न करता अंमलबजावणी झाली!

धोरण राबवणे या शब्दप्रयोगात सर्व स्वयंस्पष्ट झाले. त्या विषयांच्या जोडीला पर्यावरण, मूल्यशिक्षण हे विषय आले. तासिकांची संख्या तेवढीच, शाळेची वेळ तेवढीच, मग विषयांच्या तासिका व मिनिटांची काटछाट झाली. अमूक मूल्य विद्यार्थ्यांच्या वर्तनात पहिल्या सत्रात किती उतरले व दुसऱ्या सत्रात त्यात किती वाढ झाली? याचे मोजमाप एक ते दहा आकड्यांत! समाजसेवेच्या गुणांच्या याद्यांच्या जोडीला मूल्यशिक्षणाच्या याद्या तयार!

'काम कसेही असो, रेकॉर्ड चोख हवे' हा शब्द परवलीचा ठरला. वैद्यकीय क्षेत्रात जसे 'व्हायरल इन्फेक्शन' तसे शिक्षणक्षेत्रात 'परीक्षा'! ग्रहण कितपत झाले याची चाचपणी हे साधे तत्त्व कुठे गायब झाले ते कळले नाही. 'देवी', मलेरिया, पोलियो एवढेच काय एड्स आटोक्यात येईल पण 'परीक्षा इन्फेक्शन'वर नियंत्रण अशक्य वाटावे अशी परिस्थिती आहे. पहिलीपासून हा घटक क्रियाशील होतो. 'चाचणीत' गुण किती? सत्रात किती? नव्वद टक्केच मिळाले? खल्लास! वाट लागली! मग क्लास, क्लासवाले, गाईड, स्वाध्याय, जर्नल्स... एक मोठी इंडस्ट्रीच उभी राहिली.

मुळात घटक चाचणी ही संकल्पना होती. शिकवलेल्या एका घटकावर वर्गात अगदी एका तासिकेतच चाचणी घेतली जावी. ॲसेसमेंट तिथल्या तिथे अपेक्षित होते. पण शाळा व्यवस्थापनात सोयीचे व्हावे, 'रेकॉर्ड' करता यावे म्हणून दोन घटक

चाचण्यांची एक चाचणी परीक्षा एका सत्रात व एक दुसऱ्या सत्रात अशी 'मिनी परीक्षा' सिद्ध झाली.

परीक्षेसाठी असलेला अभ्यासक्रम कसाबसा पूर्ण करण्यामागे शिक्षक व परीक्षेला तोंड देण्यासाठी विद्यार्थ्यांचे पळणे! 'गोल' एकच — मार्क, मार्क व मार्कच! अध्यापना-तला आनंद मागे पडला आणि शिकण्यातला आनंदही! सध्याच्या 'टक्केवारी'च्या अनर्थाची ही नांदी असावी!

'शिक्षणाची गुणवत्ता घसरली' अशी सार्वत्रिक भावना आहे. खच्चून मिळणारे गुण पण प्रत्यक्ष ज्ञानाची पडताळणी केली असता नकारात्मक अनुभव!

कोळसा उगाळावा तेवढा काळा.

तेव्हा या घसरलेल्या गुणवत्तेचे खापर कोणावर फोडायचे ते बाजूला ठेवून 'आपल्या परीने शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याचा प्रयत्न करुयात' - केवळ या भावनेने सध्या कार्यरत असलेले काही शिक्षक एकत्र आले व समविचारी व्यक्तींचे, शिक्षणप्रेमींचे 'व्यासपीठ' आपोआप सिद्ध झाले.
'व्यासपीठा'च्या कार्यकर्त्यांच्या दोन-तीन महिने चाललेल्या चर्चेचा सारांश थोडक्यात असा सांगता येईल!

- ही चळवळ नाही, कोणाच्या विरोधात काही करायचे अशीही भूमिका नाही.
- शिक्षक विविध शाळांत कार्यरत आहेत. तिथे व्यवस्थापन, शिक्षण खाते, एसएससी बोर्ड यांच्या चौकटीत ते 'नोकरी' करत आहेत, त्यामुळे तिथल्या कामाबद्दल तक्रार करण्यास जागा ठेवायची नाही, ते काम चोख करायचेच आहे.
- शिक्षक आपली नोकरी सांभाळून अन्य काही उद्योग करत असतील. त्यांना आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्याही आहेत. ते सर्व सांभाळून 'व्यासपीठा'-साठी उपक्रम करायचे आहेत.
- 'व्यासपीठा'चे उपक्रम शाळेच्या वेळे-बाहेरचे असतील.
- उपक्रमासाठी लागणारा खर्च स्वत:च्या खिशातून करायचा आहे. कोणा उपक्रमास कोणी 'प्रायोजक' मिळाला तर ठीकच.
- दर महिन्यात किमान एकदा शिक्षकांनी एक यायचे, विचारविनिमय-चर्चा करायची. त्यातून उपक्रम ठरवायचा व तो पार पाडायचा. प्रत्येक सत्रात एक मोठा उपक्रम करायचा व त्यासाठी परिसरातील जास्तीत जास्त शिक्षक उपस्थित राहतील असे पाहायचे.
- शिक्षक आपापल्या शाळेत, आपल्या विषयाच्या संदर्भात विविध उपक्रम करत असतात. व्यासपीठाच्या सभांना एकत्र आल्यामुळे एकमेकांचे उपक्रम एकमेकांना- सर्वांना समजतील. शिक्षक ते उपक्रम आपापल्या शाळेत करून पाहू शकतील.
- निवृत्त शिक्षक अथवा कोणीही शिक्षणप्रेमी व्यासपीठात सहभागी होऊ शकेल.
- वर्गणी किती? हा प्रश्न पहिल्याच कार्यक्रमाच्या वेळी अनेकांनी विचारला. तूर्तास तसा काही विचार नाही. वर्गणी-सदस्य, पदाधिकारी असे काही नसेल. एकत्र यायचे व उपक्रम करताना येणाऱ्या किमान खर्चाची तरतूद व्हावी म्हणून स्वेच्छेने तो वाटून घ्यायचा एवढेच ठरले आहे. विविध मतांच्या व तसेच दृष्टिकोन असलेल्या शिक्षकांचा हा समूह असल्याने विचारविनिमयातून, दुसऱ्याच्या मताचा आदर करत निर्णय घ्यावा असे वातावरण दिसतं आहे.

**अविनाश बर्वे**
**१०६ 'सुचेता' पाटीलवाडी,**
**चंदनवाडी, ठाणे ४०० ६०१**
**फोन - २५३३७२५०**

## 'सामाजिक दस्तावेज' - फादर दिब्रिटो

संपादक,
ग्रंथाली यांस

लेखक सु.गो. तपस्वी ह्यांची, 'ग्रंथाली' प्रकाशित, सामाजिक विषयांवरील दोन पुस्तके वाचनात आली. अशा महत्त्वाच्या विषयाला प्रकाशात आणल्याबद्दल प्रथम 'ग्रंथाली'चे अभिनंदन करतो.

दोन्ही पुस्तके उत्तमरीत्या लिहिली आहेत. 'विकासाच्या वाटा' ह्या लेखसंग्रहात, मुलाखतीदरम्यान, महाराष्ट्रातील आजच्या आघाडीच्या सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रकट झालेले विचार वाचकांना, सामाजिक कार्यकर्त्यांना व मुख्यत्वे त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतील.

'मातृमंदिर' ह्या संस्थेविषयी मी खूप वर्षे ऐकून आहे. महाराष्ट्रात मातृमंदिर आणि देवरूख हे एक समीकरण झाले आहे. संस्थेच्या विविधांगी कार्याची माहिती 'विकासाची आशा' ह्या ग्रंथामुळे आली. हे पुस्तक लिहून लेखकाने फार मोठी सामाजिक कामगिरी पार पाडली आहे. हा एक मौल्यवान सामाजिक दस्तावेज आहे. सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थासाठी तो दिशादर्शक आहे.

**फादर दिब्रिटो**
सेंट थॉमस चर्च, सँडोर-वसई, जि. ठाणे, महाराष्ट्र

पुनश्च: आपले व लेखकाचे अभिनंदन.

'विकासाच्या वाटा' व 'विकासाची आशा ही दोन्ही पुस्तके 'ग्रंथाली'कडे उपलब्ध आहेत. साडेतीनशे रुपये पाठवून ती मागवता येतील.

## विद्यार्थी हा ग्राहक!

# शिक्षण ‘सेवे’चा नवा अर्थ

**शामकांत दामले**

‘व्यासपीठ’ चळवळीची दुसरी सभा ९ ऑगस्ट २००८ रोजी न्यू गर्ल्स हायस्कूलच्या सभागृहात पार पडली. त्यावेळी एका वेगळ्या आणि भविष्यकाळात आपल्याला ज्याची गरज भासेल अशा विषयाची म्हणजे ‘शिक्षणक्षेत्र आणि ISO ९००१’ची माहिती देण्यासाठी एक व्याख्यान आयोजित केले होते. त्यासाठी ह्या विषयातील तज्ज्ञ, शामकांत दामले यांना बोलावले होते. दामले (B.Tech., M.P.M.) यांनी उत्पादनक्षेत्रात बावीस वर्षे काम केले असून गेली सहा वर्षे ते ISO ऑडिटर म्हणून तर सध्या खडज संबंधित प्रशिक्षण विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. नंदिनी बर्वे यांनी त्यांची ओळख करून दिली.

दैनंदिन जीवनात आपण ISI शिक्का असलेल्या वस्तू बघतो. भारत सरकारने त्या त्या वस्तूसाठी बनवलेल्या मानकानुसार ती वस्तू बनवली गेली आहे असा त्या शिक्क्याचा अर्थ होतो. त्याचप्रमाणे ISO ९००१ हे एक आंतरराष्ट्रीय मानक आहे. मात्र ते वस्तूचे मानक नसून व्यवस्थापनाशी निगडित मानक आहे. तसे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संस्थे–मध्ये कोणती वैशिष्ट्ये आवश्यक आहेत, त्यांचे परीक्षण कोण करतो, भविष्यकाळात शिक्षणक्षेत्राला त्याची गरज का भासेल? शिक्षणक्षेत्र आणि ISO ९००१ ह्यांचा परस्परसंबंध काय इत्यादी प्रश्नांची उत्तरे त्यांनी सोप्या भाषेत, वेळोवेळी संगणकाचा वापर करत दिली.

गॅट्स ह्या जागतिक करारामुळे सेवा ह्या शब्दाची व्याख्या बदलली. त्या आधी आपण सेवा हा शब्द रूढार्थाने समाजसेवा, दीनदुबळ्यांची सेवा अशा अर्थाने वापरत होतो, पण आता सेवा ह्या शब्दाला व्यवसायाशी निगडित, म्हणजेच पैशांच्या मोबदल्यात दिलेली सुविधा असा बदलता संदर्भ आला. उदाहरणार्थ– बँकिंग सेवा, रेल्वे सेवा इत्यादी. गॅट्स कराराअंतर्गत शिक्षण ही अशी व्यावसायिक सेवा असल्याचे नमूद करून त्यातील सरकारी सहभाग (आणि हस्तक्षेप) कमी करण्याचे आपल्या सरकारने कबूल केले आहे.

शिक्षणक्षेत्रात प्रत्येक गोष्टीवर सरकारचे नियंत्रण आहे. भविष्यात जर सरकारने सर्व शाळा स्वायत्त केल्या तर त्यांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडावे लागेल किंवा कदाचित शाळेला मिळणारे अनुदान शाळेच्या मानांकनावर अवलंबून असेल. कदाचित पाठ्यक्रम बनवण्याचे कामही सरकारकडून खाजगी संस्थांकडे जाईल. TOFEL ह्या परीक्षेचे मार्गदर्शन पूर्वी फक्त ब्रिटिश कौन्सिलतर्फे होत असे. ते आता खाजगी संस्थांमार्फत होते. असे करताना ब्रिटिश कौन्सिलने ISO ९००१ मानांकन असलेल्या संस्थांना प्राधान्य दिले. जेव्हा दोन संस्थांची किंवा दोन विद्यार्थ्यांची तुलना आंतरराष्ट्रीय स्तरावर होईल तेव्हा साहजिकच आंतरराष्ट्रीय मानकाचा संदर्भ घेतला जाईल. पालक, संस्थाचालक, देणगीदार, सरकार हे सर्वजण आपापल्या परीने शाळेचे मूल्यांकन करतील. ह्या आणि अशा अनेकविध कारणांसाठी ISO ९००१ प्रमाणपत्र आणि त्यामुळे मिळणारी मान्यता ही शैक्षणिक संस्थांसाठी आवश्यक बाब होईल.

संस्थेच्या क्षमतेचे प्रदर्शन (demonstration), त्यात सुधारणा करणे आणि त्यायोगे ग्राहकांच्या समाधानात वाढ करणे हे या मानकाचे मूळ हेतू आहेत. दर्जामध्ये सातत्य हाही मानकाचा अपेक्षित परिणाम आहे. हे मानक ज्या तत्त्वांवर आधारित आहे त्या व्यवस्थापनाच्या आठ गुरुकिल्ल्या दामले यांनी विशद करून सांगितल्या. उदाहरणार्थ, ग्राहकाभिमुखता, प्रक्रियाभिमुखता, व्यावसायिक दृष्टिकोन, नेतृत्वगुण, सर्वांचा सहभाग, निरंतर सुधारणा इत्यादी. त्या अनुषंगाने ‘नियोजन, अंमलबजावणी, परीक्षण आणि सुधारणा’ हे ‘सुधारणेचे चक्र’ही त्यांनी समजावून सांगितले.

ISO ९००१ मानक शिक्षणसंस्थेला लागू केले तर त्याचे काय फायदे होतील हेही त्यांनी सांगितले. त्यातील पहिला मुद्दा असा, की मानकाची अंमलबजावणी करताना संकल्पना स्पष्ट होतील. मुख्य म्हणजे विद्यार्थी हा आपला ग्राहक आहे हे मनात ठसेल. शिक्षकांनी, ‘आम्ही विद्यार्थ्यांना घडवतो’ असे म्हटले की त्याला मर्यादा येतात. शिक्षकांनी आपला ॲटिट्यूड बदलून आम्ही विद्यार्थ्यांना शिकायला मदत करतो असे मनात बाळगावे. त्या व्यतिरिक्त संस्थेला आपली ध्येयधोरणे, उद्दिष्टे ह्यांच्या मोजमापाचे निकष आणि मापदंड ठरवावे लागतात. तसेच सर्व घटकांच्या जबाबदाऱ्या आणि अपेक्षा ठरवाव्या लागतात. त्यायोगेही संकल्पना स्पष्ट होतात. संस्थेचा हेतू काय आहे आणि तो साध्य करायला कुठल्या प्रक्रिया कार्यरत आहेत हे स्पष्ट करावे लागेल. त्या प्रक्रियांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या क्षमतेत सुधारणा घडवण्यासाठी संस्था काय पावले उचलत आहे ते दाखवून द्यावे लागेल. अर्थात हे सगळे दस्तावेज बनवताना संस्थेला पुरेसे स्वातंत्र्य दिले जाते.

शाळेला ISO प्रमाणपत्र देण्याआधी सर्व संबंधित बाबींचे नि:पक्षपाती आणि अधिकारी संस्थेतर्फे मूल्यांकन केले जाते. शाळेला स्वत:सुद्धा वारंवार अंतर्गत तपासणी करावी लागते.

# सहनशीलते, तुला सलाम!

## श्याम जोशी

प्रवासवर्णन हा खरेतर एक सकस साहित्यप्रकार. मनोरंजन करणारा, उत्कंठावर्धक माहिती देणारा आणि बसल्या जागी, विनाखर्च दूरवरच्या स्थळांची सफर करून आणणारा साहित्यप्रकार. बहुतेक वर्णने योजून केलेल्या, विपुल साधनसंपत्ती असलेल्या, नीटस, रेखीव आणि विशिष्ट हेतूने केलेल्या प्रवासाची. पण ही लक्षणे नसलेला प्रवासही अनेक अनुभव, धडे देऊन जातो आणि मनोरंजनही करू शकतो. अशाच एका सर्वसंपन्न प्रवासाचे हे वर्णन.

मे महिन्याचे दिवस म्हणजे सुटीत मुंबईहून मामाच्या गावाला जाण्याचे गर्द गर्दीचे आणि हैराण उकाड्याचे. अशाच एका दिवसातला रेल्वेचा आणि त्यातही प्रवासी गाडीचा (पॅसेंजरचा) हा प्रवास. रिझर्व्हेशन नसलेला आणि भरीत भर म्हणून भरदुपारी जाण्याचा. दादरहून दुपारी साडेतीनच्या 'निर्धारित' वेळेस सुटणाऱ्या दादर-रत्नागिरी पॅसेंजरचा. ही गाडी दुपारी अडीचच्या सुमारास रत्नागिरीहून दादरला येते. तेव्हाच स्टेशनवर असलो तर गाडीत बसायला मिळेल या भाबड्या आशेने मुंबईतील कामे आटोपून दोन चाळीसला, मध्य रेल्वेच्या आठ क्रमाकांच्या फलाटावर आलो. मनात उशीर झाल्याची धाकधूक होती. गाडी आलेली नसल्याचा आनंद झाला खरा, पण फलाटावरील तोबा गर्दी पाहून तो लगेच ओसरला. ती गर्दी होती मुख्यत: सामानाची, बायकापोरांची, म्हाताऱ्यांची आणि गाडीच्या दिशेकडे टाचा उंचावून पाहणाऱ्या पुरुषांची. बहुतेकांच्या मनात गाडी येण्याची उत्कंठा, जागा मिळेल न मिळेल याची धाकधूक, रेल्वेला आणि नशिबाला शिव्या, असाहाय्यता अशा अनेक भावना होत्या. शरीरे वेगवेगळी होती पण सामूहिक मन एक होते. ते एकाच दिशेने व त्याच पद्धतीने विचार करत होते. मोबाईलचे रिंगटोन वाजत होते. गाडीच्या येण्याची आगाऊ खबरबात मिळवण्याचा प्रयत्न होत होता. एवढ्यात ध्वनिवर्धक खरखरला. सामूहिक मनाचे लक्ष कानांवर केंद्रित झाले. आशा पल्लवित झाल्या. मात्र हिंदीमिश्रित मराठीतून झालेल्या घोषणेनंतर सामूहिक मन सहस्रश: विदीर्ण झाले. आशांचे रूपांतर निराशेत, गोंधळात, संतापात, भीतीत, असाहाय्यतेत आणि न जाणो, आणखी कशाकशात झाले. दादर-रत्नागिरी गाडी आठऐवजी पाच क्रमांकाच्या फलाटावरून सुटणार असल्याची ती घोषणा आठ क्रमांकाच्या फलाटावर हलकल्लोळ माजवून गेली. अजूनही गाडी कधी येणार हे जाहीर न झाल्याने पण ती यावयास झाली असावी अशा अंदाजाने फलाटावरील तमाम गर्दी आपापल्या सामानासकट गडबडीने पाच क्रमांकाच्या फलाटाकडे कूच करती झाली. काही सक्षम पुरुषमंडळी रूळ ओलांडून पलीकडे जाऊ लागली आणि बाकी सगळी प्रथम आठव्या फलाटाच्या एका बाजूस असलेल्या दरवाजाकडे त्यानंतर असलेल्या अरुंद जिन्याच्या पुलाकडे आणि सरतेशेवटी पाच क्रमांकाच्या फलाटाच्या टोकाच्या दिशेने रवाना झाली. मनातली रास्त तक्रार जराही जाहीर न करणाऱ्या कोकणी सहनशीलतेचा पहिला प्रत्यय मला तेथे जवळून आला.

त्या सगळ्या स्थानांतरणात तीन वाजले. उकाडा मी म्हणत होता. आठव्या क्रमांकाच्या फलाटाचे दृश्य आता थोड्याफार फरकाने पाचव्यावर दिसत होते. पोरेबाळे अधिक कावरीबावरी झाली होती. उत्कंठा, संताप, असाहाय्यता आणि शिव्याशाप मनामनात आणि आपापसात अधिक तीव्र झाले होते. गाडी येण्याची चिन्हे मात्र नव्हती. अशा स्थितीत आणखी पाऊण तास गेला. अपरिहार्य असाहाय्यतेतून आलेल्या वैयक्तिक आणि सामूहिक सहनशीलतेचा दुसरा प्रत्यय मी त्रयस्थाच्या भूमिकेतून जाणून घेत होतो. माझ्या आवाक्यात तेवढेच होते. अखेर चार वाजण्यास पाच मिनिटे कमी असताना पुन्हा एकदा प्रथम हिंदीमिश्रत मराठीत व त्यानंतर निव्वळ हिंदीत गाडी फलाटावर येत असल्याची घोषणा झाली आणि सामूहिक मनाने सोडलेला निश्वास जाणवला!

उंच टाचावाल्यांना गाडी लांबवर दिसू लागली आणि अचानक, अनेक सक्षम पुरुष मंडळींनी फलाटावरून उड्या मारल्या. ती रुळाच्या बाजूच्या गटारापलीकडे जाऊन थांबू लागली. गाडीपलीकडे उभे राहून त्या बाजूच्या दरवाजातून चढून आधी जागा पकडणे हा या प्रातिनिधिक उड्यांमागचा उद्देश होता हे चौकशीअंती कळले. बसण्याच्या जागेची चणचण मलाही होती. मी त्यांचाच मार्ग धरला आणि गटारापलीकडे जाऊन उभा राहिलो. आता तिथेही गर्दी झाली होती. सुदैवाने, सहा क्रमांकाच्या रुळावर दुसरी गाडी येण्याचा संभव नसल्याने अपघाताचा धोका नव्हता. पण गाडी आल्यावर डब्यात चढताना गटारात पडण्याचा धोका नक्की होता. सक्षम पुरुष मंडळीही नशिबावर हवाला ठेवून त्या क्षणाची वाट पाहू लागली. त्याच सुमारास पलीकडच्या फलाटावरील पोलिस व तिकिट-तपासनीस काहीशा असाहाय्यतेने, सहृदयतेने आणि 'गधा जाने और कुत्ता जाने' अशा विविध भावनांनी त्या दृश्याकडे पाहात होते. अखेर, रत्नागिरी-दादर गाडीचे धूड पाच क्रमांकाच्या फलाटावर हळुहळू फलाटस्थ झाले. माझ्या सुदैवाने गाडी थांबतानाच माझ्या नेमका समोर

एक दरवाजा आला आणि चपळता साधल्याने डब्यात चढून खिडकीजवळील जागा मी आपलीशी केली. इतर सक्षम पुरुषमंडळींनीही आपल्या पूर्वजांस लाजवील अशा चपळतेने आधी डब्यात व नंतर रिकाम्या बाकांवर उड्या मारून खिडक्या काबीज केल्या आणि आजुबाजूच्या रिकाम्या जागांवर रुमाल, हातपिशव्या ठेवून 'आरक्षण'ही केले.

त्याच दरम्यान उतरण्याच्या दरवाज्यात घमासान हमरीतुमरी आणि ढकलाढकली सुरू झाली होती. दरवाज्यालगतच्या मंडळींनी बाहेरील गर्दीत स्वत:ला सामानासकट झोकून दिले. त्यामुळे संख्या अधिक असूनही चढणाऱ्यांचा नाईलाज झाला. या युक्तीमुळे पहिले काही प्रवासी सुखरूप उतरले. माझ्या डब्यातून उतरणाऱ्यांत शेवटी शेवटी तीन-चार वृद्ध मंडळी होती. त्यांना सामानासकट उतरायला एक-दोन सेकंदांचा उशीर झाला, पण बाहेरील गर्दीला तेवढा वेळही पुरेसा होता. त्यांचे आक्रमण थोपवणे त्या वृद्धांना शक्यच नव्हते. त्यांच्या नैतिक परंतु असाहाय्य आरडाओरड्याची, वृद्धत्वाची पर्वा न करता बाहेरील लोंढा दरवाज्याच्या आत येऊन दोन्ही बाजूंना पसरू लागला आणि मिळेल ती जागा व्यापू लागला. वृद्धमंडळी अवाक होऊन कशीबशी पलीकडच्या दरवाजात सरकली आणि लोंढा ओसरण्याची वाट पाहू लागली. काही वेळाच्या धामधुमीनंतर बाहेरील अलोट गर्दी गाडीत आली. 'आरक्षण' केलेल्या जागांवरून अनुक्रमे हमरीतुमरी, वादावादी, बाचाबाची व नंतर कोलाहल सुरू झाला. काही चतुरांनी जाण्या-येण्याच्या मार्गिकेत, दरवाजात आणि संडासाजवळील आपापल्या जागा 'बुक' केल्या. येणारा लोंढा ओसरल्याचे पाहून उतरणाऱ्यांतील शिल्लक मंडळींनी डब्यातून काढता पाय घेतला आणि काही अधिक चतुरांनी तीही जागा 'कॅप्चर' केली.

डब्यातला कोलाहल कमी होऊन सामूहिक मन गाडी सुटण्याची प्रतिक्षा करत होते. ती फळास येऊन अखेर साडेतीनच्या 'निर्धारित' वेळेनंतर केवळ एक तासाने म्हणजे साडेचार वाजता दादर-रत्नागिरी गाडीने दादर स्थानक सोडले आणि अंदाजे दोन हजारांच्या सामूहिक मनाने सुटकेचा आणखी एक निश्वास सोडला.



डब्यात चांगलीच गर्दी होती. बसण्याच्या तीन जागांवर चार किंवा पाच आणि उभे राहण्याच्या जागांवर एकास एक संगती होती. येण्या-जाण्याच्या बहुतेक जागा आतापासूनच बसणाऱ्यांनी व्यापल्या होत्या. त्यामुळे पुढील स्टेशनांवर आणखी विपरीत घडण्याची भीती उभ्यांच्या मनात होती. ठाणे स्थानकावर पुन्हा एकदा एक मोठा लोंढा डब्यात शिरून असलेल्या त्यातल्या त्यात मोकळ्या जागा व्यापण्यात यशस्वी झाला. अर्थात त्याआधी स्थानिक कलाकारांचा 'संगीत वादावादी ऊर्फ बाचाबाची'चा एक मोफत नाट्यप्रयोग झाला. तो पाहायला प्रेक्षकांची कमतरता नव्हतीच!

डब्यातली गर्दी शिगेला पोचली होती. तरीही पनवेल स्थानकावर संख्येचा फरक वगळता ठाण्याचीच पुनरावृत्ती झाली. त्यातच, गाडी पनवेल स्थानकावरून सुटण्याचे चिन्ह बराच वेळ झाला तरी नव्हते. 'निर्धारित' काळवेळ केव्हाच उलटून गेली होती! गर्दी, घाम, कोलाहल, घुसमट मात्र निर्धारित असावी. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' ही वृत्तीही. तीच पोराबाळांतही रुजत होती. त्यामुळे मोठेपणी ती याहून अधिक 'निर्धारित' परिस्थितीस सामोरे जाण्यास सज्ज होत होती. शौचकुपातील पाणी संपले होते. गर्दीमुळे तेथे जाण्याची सोय नव्हतीच. स्वच्छतेसाठी पाणी नसले तरी 'बिसलरी' आणि 'अमृतजला'च्या थंड पाण्याच्या बाटल्या मात्र लिटरला दहा रुपये मोजून फुटत होत्या. सेव्हनअप-थम्सअपच्या बाटल्या तर लिटरला पन्नास रुपयांचा 'अप' दाम मोजून घशाघशात रिकाम्या होत होत्या. मोबाईल वाजत होते. 'नेटवर्क' आणि 'प्लान्स'च्या चर्चा रंगत होत्या. त्यांच्या उत्पादकांनी प्राप्त परिस्थितीला बगल देणाऱ्या किती छान छान युक्त्या सर्वसामान्यांच्या अंतरंगात रुजवल्या होत्या, पण कोणाला त्याचे सोयरही नव्हते की सुतक! अशात स्थानकावरील ध्वनिक्षेपक खरखरला. प्रवाशांना जागेवर बसण्याची आणि चालत्या गाडीत न चढण्याची सूचना हिंदीत देण्यात आली. त्यावरून गाडी सुटणार असल्याचा बोध जागेवरून उठू न शकणाऱ्या आणि गर्दीमुळे दरवाज्यात लोंबकाळणाऱ्या प्रवाशांनी घेतला. अखेर साडेसहा वाजता गाडी जागची हलली आणि कोकणमार्गस्थ झाली.

डब्याच्या तळाचा इंचन्इंच

व्यापणाऱ्या त्या गर्दीतही भेळ, सामोसे आणि महाराष्ट्र राज्यखाद्य असणारा वडापाववाले आपापली वाट काढत फिरत होते. त्यांच्या इच्छाशक्तीचे आणि चिकाटीचे कौतुक करावे तेवढे थोडे होते. कारण त्या वाट काढण्यात शरीरावयवांच्या सर्व मर्यादा ताणणाऱ्या अनेक कृती होत होत्या. बसलेल्या किंवा उभ्या प्रवाशांच्या मध्यंतरी पायाची चार बोटे टेकतील एवढी जागा शोधून, कुठेतरी अडकलेला मागचा पाय नेमका ओढून, तो शोधलेल्या जागेतच टाकण्याचे त्यांचे कसब वाखाणण्यासारखे होते. प्रवाशांचे शिव्याशाप शांतपणे पचवणे, पदार्थांची मागणी आल्यावर कुणाच्यातरी अंगाखांद्याचा उपयोग करून अथवा त्याला उठवून तिथे आपले भांडे ठेवून घामेजल्या हातांनी पदार्थ बांधून देणे, पैसे घेणे आणि पुन्हा मार्गस्थ होणे ही फेरीवाल्यांनी प्राप्त केलेली सहासष्टावी कला होय. आपल्या पदार्थाची जाहिरात करण्याची पासष्टावी कला त्यांनी त्याआधीच आत्मसात केली आहे. त्यांचे सामोसे आणि वडापाव कायम गरम राहणाऱ्यांपैकी होते. त्यांच्या आवाजात संगीत आणि कवित्वही होते : 'घ्या इकडे आणि खा तिकडे', 'घेता विकत की वाटू फुकट', 'तीन सामोश्यांवर एक मोबाईल फ्री', 'मामाच्या लग्नात मामीने बनवलेले सामोसे' यांसारख्या संगीतमय घोषणा त्याची साक्ष होत्या. पोटाची विकतची सोय आणि सोबत फुकटचे मनोरंजन होत असल्याने प्रवासी जनताही फेरीवाल्यांची ये-जा. लत्ताप्रहारासकट सहन करत होती.

डब्याबाहेर कोकण रेल्वेच्या गाड्यांची ये-जा सुरू होती. आमची गाडी 'पॅसेंजर' असल्याने इतर गाड्यांना प्राधान्य होते. त्यातच मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वे यांचे वाकडे असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे कोकण रेल्वेच्या अखत्यारीतल्या रोह्या-पर्यंतची गाड्यांची दिरंगाई मध्य रेल्वेकडून जाणुनबुजून केली जात असावी असे कानावर आले. कोकणाबाबतचा दुजाभाव येथेही सुरू होता.

या सर्वांतून मार्ग काढत, ठिकठिकाणच्या मामांची गावे मागे टाकत, त्यांच्या भाच्यांना तेथे सुखरूप सोडत गाडी मामाच्या पुढच्या गावाला जात होती. प्रवासी आणि दाटीवाटी कमी होत होती आणि अखेर, साडेनऊ तासांच्या अविस्मरणीय प्रवासानंतर रात्री दोन वाजता म्हणजे निर्धारित वेळेपेक्षा अडीच तास उशिराने गाडीने रत्नागिरी स्थानक गाठले. तोपर्यंत गाडीत बसल्या जागेवर पेंगुळलेले विश्व जागे झाले आणि स्थानकावर उतरून गाडीखर्चापेक्षाही अधिक रिक्षाभाडे देऊन आपापल्या गावात जाण्यासाठी सज्ज झाले. माझ्यासकट त्यांच्या सहनशीलतेला सलामच नव्हे तर तिच्यापुढे नतमस्तक होण्याशिवाय मला गत्यंतर नव्हते!

**डॉ. श्याम जोशी**
**प्रीती अपार्टमेंट,**
**डीबीजे कॉलेज, चिपळूण,**
**जि. रत्नागिरी - ४१५६०५**
**फोन : (०२३५५) २५७१६६**

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ



**सहनैसर्गिक जीवनशैली - श्याम जोशी**

ज्याअर्थी अल्पबुद्धीचे प्राणी केवळ निसर्गनियमांच्या उपजत पालनातून शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक; एवढेच नव्हे तर गरजांची मागणी व पुरवठा या स्तरावरील आर्थिक आरोग्यही स्वयंपूर्णपणे प्राप्त करू शकतात, त्याअर्थी स्वतंत्र बुद्धीची असीम ताकद असलेला मानव आपले सर्वांगीण आरोग्य राखू शकला पाहिजे आणि आनंदी जीवन जगू शकला पाहिजे..... एका वेगळ्या जीवनशैलीचे आग्रही प्रतिपादन.

**मूल्य ५० रुपये**
**सीडीसह पुस्तक ७५ रुपये**

ग्रंथाली, म्युनिसिपल स्कूल इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन,
डॉ. भडकमकर मार्ग पोलिस स्टेशनसमोर, ग्रँटरोड, मुंबई-४०० ००७
फोन : २३८७ ५४ ८१ / २३८७२४ ४५

# एकुलत्या एक मुलाचा अपघाती मृत्यू

विजय वि. जोशी

अमेरिकेतल्या औषधे बनवणाऱ्या एका मोठ्या कंपनीत वरच्या हुद्यावर काम करणारे स्मिथ यांचा एकुलता एक मुलगा एक वर्षापूर्वी, गिर्यारोहणाला गेलेला असताना अपघातात मरण पावला. आपण गेल्या वर्षभरात दु:खी भावनांना कसे सामोरे गेलो, आपल्या मनात विचार काय आले ह्याचे एक वडील ह्या नात्याने केलेले विश्लेषण स्मिथ यांनी 'न्यू यॉर्क टाइम्स'च्या रविवारच्या पुरवणीत 'About Men' ह्या सदरामध्ये एका छोट्या लेखात सादर केले आहे. त्यातून 'रुची'च्या वाचकांना अमेरिकन 'माणूस' अशा दुर्धरप्रसंगी कसा हळवा व भावनाशील होतो ह्याचे दर्शन घडेल.

स्मिथ म्हणतात– मला जेव्हा माझा बावीस वर्षांचा एकुलता एक मुलगा अपघातात गेला असे कळले त्यावेळी सर्वप्रथम माझ्या मनात विचार आला, की आता, मला आणि माझ्या पत्नीला नातवंडे होणार नाहीत. आपल्या आयुष्याची कमाई आणि स्मिथ कुटुंबाची पिढ्यान्पिढ्या चालत आलेली, परंपरा, त्यांचे शहाणपण यांचे संचित पुढच्या पिढीला देता येणार नाही. माझ्या घरात असलेला जुना ऑर्गन, माझ्या पत्नीच्या आजोबांनी स्वत: बनवलेली आरामखुर्ची, घरातील इतर मौल्यवान वस्तू आणि आमची इस्टेट ह्यांचा वारसा घ्यायला मुलगा आणि नातवंडे नसणार! मी माझ्या नातवंडांना माझ्या वडिलांसंबंधी अगर त्यांच्या तऱ्हेवाईक व वैशिष्ट्यपूर्ण नातेवाईकांसंबंधी, आमच्या भरीव व स्थिर परंतु कदाचित आजच्या कल्पनांप्रमाणे फारशा रंगतदार नसलेल्या वैवाहिक आयुष्यासंबंधी किंवा माझ्या पत्नीच्या माहेरच्या मंडळींसंबंधी गोष्टी सांगू शकणार नाही.

माझ्या आयुष्यातील ह्या दुर्धर प्रसंगाचा आरंभ एका शुक्रवारी सकाळी झाला. मला माझ्या पत्नीने, जेनने माझ्या कार्यालयात फोन केला (ती सहसा कामाच्या वेळी मला फोन करत नाही). तिला त्या दिवशी सकाळी दहा वाजता त्या गिर्यारोहणाच्या ठिकाणच्या शासकीय अधिकाऱ्यांचा निरोप मिळाला, की जॉन (आमचा एकुलता एक मुलगा) बुधवार दुपारपासून बेपत्ता आहे. त्यावेळपर्यंत नीट माहिती फारशी मिळाली नव्हती, पण त्या निरोपाप्रमाणे माझा मुलगा आणि त्याचा साथीदार ह्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी जायचे ठरवले होते. हेलिकॉप्टर, खास प्रशिक्षित कुत्री आणि कर्मचारी यांना गुरुवारपर्यंत जॉनचा शोध लागला नव्हता. तो शासकीय अधिकारी परत साडेबारा वाजता फोन करणार होता.

जेनचा फोन एक वाजला तरी आला नाही, म्हणून मी तडक घरी गेलो. मी स्वयंपाकघरात शिरलो तर आमच्या उठा-बसायच्या खोलीत नेहमी असलेला जॉनचा फोटो जेवणाच्या टेबलावर आढळला. त्या फोटोजवळ जॉन पूर्वी वापरत असलेला गिर्यारोहणाच्या प्रदेशाचा एक जुना, फाटत असलेला नकाशा उघडून ठेवला होता. आमची शेजारीण मोठ्याने हुंदके देणाऱ्या जेनचे सांत्वन करत होती. मी त्याक्षणीच मनातून समजलो, की जॉन आम्हाला सर्वांना सोडून गेला! जेनने पण लगेच सांगितले, की एकच्या सुमारास त्या शासकीय अधिकाऱ्याचा फोन आला, की जॉनचे शव सापडले. जॉनचा मृत्यू खूप उंचावरून पडल्यामुळे झाला होता. जेनने हे सर्व सांगितल्यामुळे जॉन नुसता जखमी झाला असेल अशी जी एक अंधुक आशा वाटत होती ती लोपली!

आम्ही गिर्यारोहणाच्या ठिकाणी जायला निघालो, त्यावेळच्या प्रवासात माझ्या मनात अनेक भावनांचा कल्लोळ चालला होता. माझा मुलगा अशा तऱ्हेने गेला म्हणून शोकाच्या, दु:खाच्या भावनेबरोबर माझ्या मनात एक प्रकारची क्रोधाची, रागाची भावना उसळत होती – राग अशासाठी, की कायमच्या पुत्रविरहाची असह्य 'शिक्षा' मला का व्हावी? – त्याबरोबरच अशी एक वेडी आशा पण वाटत होती, की जॉनच्या मृत्यूसंबंधी, त्याचे शव ओळखण्यासंबंधी त्या शासकीय अधिकाऱ्याची काहीतरी चूक झाली असेल! पण ह्या सर्व भावनांपेक्षा तीव्रतेने जाणवत होता तो एकाकीपणा! माझ्याबरोबर पंचवीस वर्षे संसार केलेली जेन माझ्या शेजारी विमानात बसलेली असताना, विमान प्रवाशांनी भरलेले असताना आणि विमान-तळावर इतकी वर्दळ असतानासुद्धा मला मनस्वी एकाकीपणा वाटत होता.

जॉनच्या मृत्यूनंतर बरेच दिवस गेल्यावर एकाकीपणाची तीव्रता काहीशी कमी झाली आहे – पण अजून एकाकी वाटणे पूर्णत: नाहीसे झालेले नाही.

जॉनच्या मृत्यूनंतरच्या काळात मला एका गोष्टीची विस्मयपूर्वक जाणीव झाली, की आपला मुलगा लग्न करेल, त्याला मुले होतील आणि ती सर्व आपल्यानंतर ह्या जगात राहतील ही भावना आपली सोबत नकळतपणे कशी करत असते आणि आपल्या अनेक विचारांचे आणि कृत्यांचे घडण करत असते. पण आता एकदम त्या भावनेची सोबत गेली होती आणि त्या भावनेवर आधारित असलेले माझे विचार, कृती मला एकदम विचित्र वाटू लागल्या होत्या. मला सुकाणू नसलेल्या एखाद्या जहाजाप्रमाणे दिशाहीनपणे भरकटल्यासारखे वाटू लागले होते.

आपल्या मुलांचे भविष्यकाळात काय होणार ह्याचे आपल्याला निश्चित ज्ञान नसते किंवा त्यासंबंधी भाकितही करता येत नाही.

जॉन जगला असता तर त्याचे पुढचे आयुष्य सुखासमाधानात गेले असते का दु:खमय, यातनामय झाले असते, कुणास ठाऊक? पण एक मात्र मला नक्की माहीत होते, की गिर्यारोहणाची तयारी करत असताना आपण निसर्गाच्या सान्निध्यात मनुमरादपणे काही दिवस घालवणार ह्या विचाराने तो अतिशय आनंदला होता आणि आपण एक आगळावेगळा साहसी उपक्रम करत आहोत ह्याचा त्याला अभिमान वाटत होता. त्याचा गिर्यारोहणाचा साथीदार आणि त्याचे मानववंशशास्त्राचे प्राध्यापक- जे मृत्यूपूर्वी दोनच दिवस आधी त्याच्याबरोबर होते - म्हणाले होते, की जॉन त्यावेळी अतिशय समाधानी व आनंदी दिसत होता. ह्या सर्व गोष्टींची आठवण झाली, की मला असे वाटते, की क्षणभंगूर का असेना पण प्रत्येकाच्या जीवनातील आनंद, अभिमान व समाधान ह्या सुखद भावनांनी जॉनला सोबत दिली होती. जॉनने पण मृत्यूपूर्वी काही दिवस आधी पितृदिनानिमित्त (अमेरिकेत मे व जून महिन्यांतील दुसऱ्या रविवारी अनुक्रमे मातृदिन व पितृदिन साजरा केला जातो.) मला मुद्दाम फोन करून शुभेच्छा व नमस्कार कळवला होता - त्यावेळेला त्याने आपण नुकतेच कसे गरूड व रानटी अस्वले पाहिली, एका सरोवरात कसे मोठे मासे पकडले आणि आता आपण गिर्यारोहणाच्या अनुभवाची किती उत्सुकतेने वाट पाहात आहोत हे सांगितले होते.

दु:ख ही भावना वैयक्तिक असते. मला असे वाटते, की माझी दु:खाची भावना ही एक प्रकारे माझ्या आप्पलपोटेपणाची निदर्शक आहे. मी असे म्हणतो, याचे कारण असे, की मी दु:खी झालो आहे ते मला आता जॉनचा सहवास मिळणार नाही, म्हणून; मी जॉनला युरोपच्या सहलीसंबंधी सांगू शकणार नाही, म्हणून; मी जॉनला यशस्वी होण्या-करता मदत करू शकणार नाही, म्हणून; म्हणजे ह्याचा अर्थ मी असा करतो, की मी जॉनकरता दु:ख करत नाही तर माझ्या आणि माझ्या पत्नीच्या आयुष्यात त्याने जे सुख, समाधान, आनंद, अभिमान, आदर आणले असते ते त्याच्या मृत्यूमुळे आमच्या-पासून हिरावले गेल्यामुळे दु:खी झालो आहे.

दु:खाची तीव्रता गेल्या काही दिवसांत काहीशी कमी झाली आहे - आणि मला कधी कधी मन:शांती वाटू लागली आहे. विशेषत:, जॉनला श्रद्धांजली वाहण्याच्या दिवशी मी श्रद्धांजली स्पष्टपणे व नीटपणे, भावना-तिशयाने हेलावून न जाता वाचून दाखवली. त्यावेळी मला दु:ख आवरण्याकरता वेगळ्या प्रकारचे सामर्थ्य व मन:शांती प्राप्त झाले. मी, जेन आणि जॉनचे तीन जिवलग मित्र ह्यांनी मिळून जॉनला, तो गिर्यारोहणाला ज्या ठिकाणी गेला होता त्या ठिकाणी जाऊन ज्यावेळी श्रद्धांजली वाहिली आणि मी व जेनने मिळून जॉनच्या मृत्यूच्या स्थळी असलेल्या एका छोट्या झऱ्यात त्याची राख पसरवली, त्यावेळी पण अशाच भावनांचा अनुभव मला आला व एक प्रकारचा विरंगुळा वाटला.

जॉनच्या मृत्यूनंतर काही महिने लोटले आहेत. अजून मी व जेन जॉनच्या मृत्यूच्या घटनेशी झगडत आहोत. मला जाणीव आहे, की मला व माझ्या पत्नीला मी आता सावरले पाहिजे - पण आमच्या आयुष्यात निर्माण झालेली ही पोकळी भरून निघणार कशी? - कुणाला दत्तक म्हणून घेऊन, एखाद्या सामाजिक कार्याला वाहून घेऊन? का ज्या गिर्यारोहणात जॉनला मृत्यू आला ते गिर्यारोहण तरुण मंडळींना अधिक सुरक्षित व्हावे म्हणून प्रयत्न करून? या प्रश्नाचे उत्तर मला अजून सापडलेले नाही.

**शरीरबाह्य बीजोत्पादन (शबी)**

(In-vitro fertilization)

'शबी' हे तंत्र वापरून जगातील पहिले बालक इंग्लंडमध्ये जन्माला आले त्या घटनेला २७ जुलै, २००८ ह्या दिवशी तीस वर्षे पूर्ण झाली. लुईस ब्राऊन (त्या बालिकेचे विवाहोत्तर नाव) एक व्यवस्थापकीय कर्मचारी म्हणून ब्रिस्टल (इंग्लंड) येथे काम करते. तिला स्वत:ला नैसर्गिकरीत्या जन्मलेले एक मूल आहे. लुईस ब्राऊन 'पहिली टेस्ट ट्यूब बेबी' म्हणून त्या क्षेत्रातील क्रांतीची निदर्शक ठरली. त्यानंतर 'शबी' व तत्सम इतर तंत्रे वापरून पाश्चात्य जगात आतापर्यंत तीस लाख मुले जन्मली आहेत. हे तंत्र वापरून मूल होणे म्हणजे ईश्वरी संकेताच्या विरुद्ध जाणे आहे असा आक्षेप काही धर्मगुरू घेतात - परंतु मूल होत नसणाऱ्या दांपत्यांना 'शबी' व तत्सम तंत्रे वरदान ठरली आहेत हे मान्य करावे लागेल.

अमेरिकेतील मूल न होणाऱ्या स्त्रियांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे - वय पंधरा ते एकोणतीस वर्षे - दहा टक्के, तीस ते चौतीस वर्षे - सतरा टक्के, पस्तीस ते एकोणचाळीस वर्षे - तेवीस टक्के व चाळीस ते चव्वेचाळीस वर्षे - सत्तावीस टक्के - म्हणजे सर्वसाधारणपणे कल्पना असते त्यापेक्षा अधिक स्त्रियांना ही समस्या भेडसावत असे म्हणावे लागेल. शिवाय सांप्रतच्या काळातील विवाहाच्या वेळचे स्त्रियांचे वाढते वय ह्या तंत्राची मागणी वाढवते. एका आर्थिक आढाव्यानुसार, अमेरिकेत ह्या तंत्रज्ञानाचा वापर करण्या-भोवती तीनशे कोटी डॉलर्सची उलाढाल होते.

'शबी' व तत्सम तंत्रांमुळे अपत्यहीन मातांची इच्छा पूर्ण होऊ शकते, परंतु ह्या तंत्रांमुळे जन्मलेल्या मुलांमध्ये काही समस्या निर्माण होतात ह्याची पण जाणीव ठेवायला हवी - उदाहरणार्थ, जुळी मुले होण्याची सुमारे पंधरा-तीस पट अधिक शक्यता, तान्ह्या मुलांमधील आजारांचे अधिक प्रमाण, काही विशिष्ट शबीसमान पद्धतींनंतर (उदाहरणार्थ-intracy to plasmic sperm injection - इंट्रासायटोप्लाझ्मिक इंजेक्शन) जन्मलेल्या मुलांमधील शारीरिक व्यंग, बौद्धिक न्यूनता ह्यांचे अधिक प्रमाण.

**डॉ. विजय वि. जोशी**
**वेस्ट विंडसर, न्यू जर्सी, अमेरिका**
**Email : vajsn@hotmail.com**

# एक असामान्य सावरकरभक्त

पद्मा कऱ्हाडे

मी व माझे मिस्टर पुरुषोत्तम कऱ्हाडे अंदमानला सप्टेंबर २००७ मध्ये गेलो होतो. शंकर अभ्यंकरांबरोबर. तेथील तीन दिवसांच्या मुक्कामात विद्यावाचस्पतींची सावरकरांवरील प्रवचने एकीकडे ऐकत होतो आणि त्यांच्यासमवेत अंदमान पाहात होतो.

सावरकरांची तेथील अकरा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा आठवून काळीज गलबलून जाते. अंदमानात जाऊन, सावरकरांवरील प्रवचने, तीही विद्या-वाचस्पतींच्या तोंडून ऐकणे हा कपिलाषष्ठीचा योग होता. अंदमानात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना, सावरकरांना अनेक हालआपेष्टांना तोंड द्यावे लागले. त्याचे यथार्थ व भावपूर्ण वर्णन अभ्यंकरांच्या तोंडून ऐकल्यावर, ज्यावेळी आम्ही सेक्युलर जेलचे दर्शन घ्यायला गेलो, त्यावेळी प्रत्येक जण भारावून गेला होता. सावरकरांना जेथे ठेवले होते त्या १२३ क्रमांकाच्या कोठडीत प्रवेश करताना, पावले जड झाली व प्रत्येकाच्या डोळ्यांत पाणी आले.

अंदमानहून परत आल्यावर देशमुख यांना- आमच्या मित्राला- जेव्हा मी हे सर्व सांगितले, त्यावेळी त्यांनी मला प्रभाकर मोने यांच्याविषयी जे काही सांगितले, ते ऐकून मी अक्षरश: थरारून गेले.

त्या गोष्टीला एक वर्ष व्हायला आले. मी व देशमुख, आम्ही दोघे प्रभाकर मोनेंकडे गेलो.

प्रभाकर मोने हे असामान्य सावरकर-भक्त आहेत. ते बाहत्तर वर्षांचे आहेत. ते १७ मे १९७९ रोजी अंदमानला गेले होते. जाताक्षणीच, ''सावरकरांनी ज्या काळ-कोठडीत अनेक वर्षे भोग भोगले, त्याचा किंचितसा अनुभव घेण्यासाठी त्या कोठडीत एक रात्रभर राहण्याची माझी इच्छा आहे'' असे मोनेंनी त्यावेळचे चीफ कमिशनर (शंकरलाल शर्मा) यांना सांगितले. मोनेंची मागणी ऐकताच शर्मा ताडकन आपल्या खुर्चीवरून उठले व डोळे विस्फारून म्हणाले, ''काय? त्या कोठडीत तुम्ही राहणार? या आधी तशी अनुमती कुणीही मागितली नव्हती.''



प्रभाकर मोने

''पण मी मागतोय ना.'' मोने म्हणाले.

त्यावर शर्मा म्हणाले, ''त्या भागात रात्री-अपरात्री कुणी फिरकत पण नाही. तेथे सर्व भीतीचे वातावरण आहे. तिथे भुतेखेते वावरतात. उद्या तुमचे काही बरेवाईट झाले तर जबाबदार कोण?''

तेव्हा अत्यंत खणखणीतपणे मोने त्यांना म्हणाले, ''भुतखेतांची मला भीती वाटत नाही. मी स्मशानात राहिलेला माणूस आहे. शिवाय माझे काही बरेवाईट झाले तर त्याची संपूर्ण जबाबदारी माझी एकट्याची. तसे मी आपल्याला लिहून देतो.''

त्यानंतर शर्मांनी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस व तुरुंगाधिकारी अरविंद चटपल्लीवार यांना बोलावून घेतले. त्या दोघांच्याही चेहऱ्यावर नाराजी होती. त्यावेळी मोने यांनी झटकन आपल्या बॅगेतून लेटरहेड काढून त्यावर स्वत:चे प्रतिज्ञापत्र सही करून दिले.

तुरुंगाधिकाऱ्यांनी त्यांच्या अटी मोनेंना सांगायला सुरुवात केली. कोठडीबाहेर दोन पोलिस कंदील घेऊन मोनेंना सोबत करतील, कोठडीत एक वेगळा कंदील राहील, वगैरे वगैरे.

मोनेंनी त्या सर्व अटी झुगारून, तुरुंगाधिकाऱ्यांकडे बंदिवानाचे कपडे मागितले.

मोने संध्याकाळी सातनंतर अंगात चोळणा, अर्धी चड्डी व पायांत रबराच्या सपाता घालून वीत-वीत रुंदीचे काळेभोर खेकडे चुकवत कोठडीत शिरले. कारागृहाच्या भिंतींवर असलेल्या लाखो पाली टॉव टॉव असा अशुभ आवाज करत वातावरण भयभीत करत होत्या. ते कारागृह वापरात नसल्याने पाली, मोठमोठे डास, वाघुळे, रातकिडे व रानटी गवताने भरून गेले होते.

रात्री आठच्या सुमारास विजांचा कडकडाट करत जोरदार पाऊस सुरू झाला. शेकडो पाली टपाटप मोनेंच्या अंगावर पडायला लागल्या. मोनेंनी त्यांना दोन्ही हातांनी झटकून ठेचायला सुरुवात केली. वेगाने, त्या पुन्हा पुन्हा मोनेंच्या अंगावर पडू लागल्या. मोनेंनी त्या दोन तासांत टोपलीभर पाली मारून कोपऱ्यात साठवून ठेवल्या.

मोनेंनी दुसरी एक महत्त्वाची गोष्ट केली. ती म्हणजे त्यांनी अंदमानला जाताना, पुण्याचे चित्रकार विष्णुपंत कुलकर्णी यांनी तयार केलेले सावरकरांचे एक अप्रतिम तैलचित्र ते घेऊन गेले. मुख्य कमिशनर शंकरलाल शर्मांच्या अनुमतीने, त्यांनी ते १२३ नंबरच्या कोठडीत, तिथल्या भिंतीवर लावले.

कित्येकांनी सेल्युलर जेलमधील त्या १२३ क्रमांकाच्या काळकोठडीचे दर्शन घेतले असेल, त्या प्रत्येकाला गहिवरून आले

असेल, त्यांचे डोळेही पाणावले असतील, परंतु प्रभाकर मोने यांच्या मनात जो विचार आला, तसा विचार कोणाच्याही मनात आला नसेल. मोने यांनी तो विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवला आणि एक रात्र त्या काळकोठडीत घालवली!

मोने यांची तब्येत या वयात फारशी बरी नाही. ते जास्त वेळ बोलूही शकत नाहीत. परंतु त्यांनी लिहिलेले आणि परचुरे प्रकाशन मंदिराने प्रकाशित केलेले 'वीर सावरकर चित्रपट – एक शिवधनुष्य' हे पुस्तक वाचून मोने यांच्याविषयी अजूनही बरेच काही मला समजले.

मोने वयाच्या सातव्या वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आहेत. वयाच्या सोळाव्या वर्षी संघाचे प्रचारक अरविंद हर्षे यांच्या चाळीस मिनिटांच्या सावरकरांवरील बौद्धिकाने, त्यांच्या मनावर सावरकरांचा विचार रुजला. त्याच रात्रभर जागून त्यांनी 'माझी जन्मठेप' वाचले.

त्यांनी सावरकर जिथे जिथे गेले, तिथे जाऊन, तिथली धूळ मस्तकाला लावीन अशी शपथ घेतली व ती पूर्णही केली.

त्यांना १९५६ ते १९६६ या काळात आपल्या आराध्यदैवताला – सावरकरांना जवळून पाहण्याची, त्यांच्याशी चार शब्द बोलण्याची संधी मिळाली.

अंदमानच्या काळकोठडीत एक रात्र राहून परतताना, त्यांची सुधीर फडके यांच्याशी योगायोगाने, विमानात भेट झाली. त्यानंतर त्या दोघांनी एकत्र काम करून 'वीर सावरकर' चित्रपट काढला. चित्रपटासाठी निधी जमवण्यासाठी मोनेंनी कार्यक्रमांचे आयोजन केले. मोने चित्रपटाचे निर्मितिप्रमुख होते.

**पद्मा कऱ्हाडे**
**१, गणेशभुवन, नटवरनगर रोड नं. २,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई–४०० ०६०**
**मोबाईल – ९२२३२६२०२९**

## अमेरिकेचा दहशतवाद : एक वेगळा अर्थ

कुमार केतकर ह्यांस,

'ग्रंथाली'च्या दोन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभातील आपलं 'दहशतवाद' या विषयावरचं अप्रतिम भाषण ऐकलं. संपूर्ण भाषण विषयाला घट्ट धरून होतं. तो वस्तुनिष्ठ विश्लेषणाचा, एक आदर्श नमुना होता. मला आपलं '१९७९ साल आणि दहशतवाद' ह्याबद्दलचं विश्लेषण विशेष पटलं. मुद्देसूद भाषण चालू असताना ते संपू नये असं वाटलं.

अनेक वर्षांपूर्वी सुंदराबाई हॉलमध्ये ब्रिटिश कम्युनिस्ट पार्टीचे अध्वर्यू हॅरी पॉलिट यांचं 'ब्रिटन्स फॉरेन पॉलिसी' या विषयावरचं भाषण सव्वा तासानंतर त्यांनी आवरतं घेतलं, तेव्हा श्रोते हलायला तयार नव्हते. आपलं भाषण संपलं तेव्हा मला तसंच वाटत होतं.

प्रकाशित दोन पुस्तकं
**नाझी नरसंहार**
**कुमार नवाथे**
आणि
**तांबडं रक्त : नवा हल्ला**
**अरुण मोकाशी**
ही दोन पुस्तके केवळ ३५० रुपयांत
घरपोच मिळू शकतील.
संपर्क : ग्रंथाली, म्युनिसिपल स्कूल इमारत,
पहिला मजला, टोपीवाला लेन,
डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
फोन : २३८९ २४४५/ २३८७५४८१

दहशतवादाच्या संदर्भात असाच एक 'पॉईंट ऑफ व्ह्यू' ठेवतो. 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन'च्या दृष्टिकोनातून पाहिलं तर अमेरिकेची दादागिरी, विशेषत: गेल्या वीस–पंचवीस वर्षांतली, ही पुढे उद्भवणाऱ्या परिस्थितीला आधीच/वेळीच बंधन घालण्याकरता केलेली कारवाई आहे असं आपल्याला नाही वाटत? ती जाणुनबुजून, विचार करून केलेली नसली असं एक वेळ मान्य केलं, तरी तिचा एण्ड–रिझल्ट तसा वाटतो, एवढं खास.

ह्याची अमेरिकन दहशतवादाच्या संदर्भात आणखी एक corrollary म्हटल्यास थोडंसं विषयांतर.

अमेरिकेची कोणतीही चाल ही आपण जगातील एकमेव बलाढ्य राष्ट्र कसे होऊ या विचारातून आलेली आहे. मध्यपूर्वेमधून उठलेला उद्रेक जर काही काळ थोपवता आला किंवा वळवता आला तर आपल्याला आपलं वर्चस्व वाढवायला आणि टिकवायला मदत होईल, हा तो विचार.

त्या दृष्टीनं पाहता भारताला आपला मित्र केल्यास आपोआपच, शत्रूचा मित्र तो आपला शत्रू ह्या लॉजिकद्वारे, भारत हा मध्यपूर्वेतील इस्लामी राष्ट्रांचा शत्रू, किमान persone-non-grate होईल आणि त्यांचा रोख भारताकडे वळेल ही अमेरिकन विचारधारा नाकारता येईल?

भारत–अमेरिका अणुकरारात हाईड अॅक्ट हाताशी धरून भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर अंकुश ठेवण्यात येईल आणि इस्लामी दहशतवादाचा रोख, क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशनच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, पूर्वेकडे वळू लागेल. That will give USA the necessary breathing time to further consolidate their position vis-a-vis the middle east.

भारत–अमेरिका अणुकराराच्या सुरुवातीला दिल्लीच्या अमेरिकन अॅम्बॅसडरने आपल्या परराष्ट्रखात्यातील प्रवक्त्याला बोलावून इराणविरुद्ध युनोत मत नोंदवण्यास राजी केलं होतं. ही पुढील काळातील होणाऱ्या घडामोडींची नांदीच होती असं म्हटलं तर ते गैर होणार नाही.

**कृ.ना. कुडाळकर**
**गुलमोहोर, ३५ वेस्ट अॅव्हेन्यु,**
**सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०० ०५४**
**फोन – २६४६१८१८**

# भाषेचा संस्कार : ‘कळत-नकळत’ही

जयवंत चुनेकर

**इतर छापील माध्यमांचाही विचार**

नियतकालिकांमधील लेख, कथा, यांत; तसेच ग्रंथांतही शब्दांचा प्रामादिक वापर, सदोष वाक्यरचना नजरेस येते.

**खुद्द ‘रुची’चेच उदाहरण**

‘रुची’च्या ऑगस्ट २००८ च्या अंकात द.म. सुकथनकरांच्या मुलाखतीचे शब्दांकन प्रसिद्ध झाले आहे. त्यामध्ये दहा-बारा तरी शब्द दोषपूर्ण आहेत. पण मला महत्त्वाच्या वाटलेल्या तीन शब्दांची उदाहरणे घेतो.

एका ठिकाणी सुकथनकरांनी दिलेल्या उत्तरातही इंग्रजी वाक्ये (देवनागरी लिप्यंतर करून) दिली आहेत. त्यांतील एक वाक्य ‘‘त्यावेळी पीपल हॅव ए फंडामेंटल राइट टू स्टे ॲण्ड लिव्ह एनीव्हेअर ऑन व स्ट्रीट ऑर पेवमेंट असा एक विचार मांडला गेला.’’ यात ‘ऑन’ नंतर ‘अ’ (किंवा ‘ए’) ऐवजी ‘व’ हे मराठी उभयान्वयी अव्यय हवे, हे सहज लक्षात येते. पण पुढे लगेच ‘‘त्याला राईट टू प्रोफेशन-व्होकेशन ॲड राईट टू लीव असे एक गोंडस स्वरूप त्यांच्यातर्फे देण्यात आले...’’ या वाक्यात ‘व्होकेशन’ या शब्दानंतर ‘ॲण्ड’ ऐवजी ‘ॲड’ असा शब्द छापला गेला आहे. ‘ॲड’ या इंग्रजी शब्दाला वेगळा अर्थ असल्याने येथे योग्य प्रकारे शब्द छापला जाण्याची काळजी घेणे आवश्यक होते.

याच परिच्छेदात ‘न्या. चंद्रचूड गेव्ह धीस टू जजमेंटस्’ असे वाक्य आहे. येथे ‘धीस’ याऐवजी ‘दीज’ (धीज?) असे अनेकवचनी रूप असणे योग्य आहे, हे उघड आहे.

**चर्चा व्हायला हवी**

या निमित्ताने नेहमीच मनात येणारा, चर्चा व्हायला हवी असा एक विचारही नोंदवून ठेवतो: इंग्रजी शब्दांचे ‘देवनागरी’त लिप्यंतर करताना, इंग्रजी शब्दांचे उच्चार दर्शवणाऱ्या ध्वनिचिन्हांच्या साह्याने प्रमाण-लेखन कसे करावे, याचाही (लिखित) भाषेच्या एकरूपतेच्या दृष्टीने तज्ज्ञांनी विचार करायला हवा. उदाहरणार्थ, two, too, to या शब्दांचे लिप्यंतरित लेखन. यांतल्या पहिल्या दोनचा ‘ऑक्स्फर्ड’प्रमाणे दीर्घ उच्चार; तर तिसऱ्याचा तीन प्रकारचा दर्शवला आहे. शब्दांच्या अर्थात भेद आहे. मग त्याचे लिप्यंतरित लेखन कसे करावे?

**आणखी दोन चुका**

पृष्ठ २३ वर, ‘जिल्हा परिषद स्थापन झाल्यानंतर यशवंतरावांनी धनंजय गाडगीळ, जे गोखले इंस्टिट्यूटचे डायरेक्टर होते....’ असे वाक्य आहे. यातील ‘इंन्स्टिट्यूटचे’ हा शब्द प्रामादिक आहे. एक तर ‘इ’वर अनुस्वार दिल्यावर ‘न्स्टि’मधील अर्ध्या ‘न्’ची गरज नाही; किंवा अर्धा ‘न्’ वापरला तर ‘इ’ वर अनुस्वाराची गरज नाही.

ह्याच पृष्ठावर, तिसऱ्या रकान्यातल्या तिसऱ्या परिच्छेदात ‘‘आदर्श चीफ मिनिस्टर म्हणून मी त्यांचा पाहात होतो’’... या वाक्यात ‘त्यांचा’च्या ठिकाणी ‘त्यांना’ हवे. तरच वाक्याचा योग्य अर्थ सूचित होईल.

**खुद्द माझ्याही लेखात!**

खुद्द माझ्या लेखातही असे दोन प्रमाद घडले आहेत. पृष्ठ १७ वरील डाव्या रकानातल्या तिसऱ्या परिच्छेदात ‘दर्शवलेल्या प्रमाणांना...’ यामध्ये ‘प्रमाणांना’ या ठिकाणी ‘प्रमादांना’ असा शब्द हवा. दोन्हींच्या अर्थात सहजपणे लक्षात येणारा अर्थभेद असल्याने हा प्रमाद दुर्लक्षणीय ठरत नाही. तसंच पृष्ठ १८ वर उजव्या रकान्यात ‘स्वत:चा सार्थ’ या शब्द संहितीमध्ये ‘सार्थ’ ऐवजी ‘स्वार्थ’ हवे, तरच माझ्या प्रतिपादनाचा नेमका अर्थ लक्षात येईल. असेच आणखी एका ठिकाणी घडले आहे. पृष्ठ १७ वरील तिसऱ्या रकान्यातल्या शेवटच्या परिच्छेदात ‘प्रतिक्रियेची सुरुवात’ यातील पहिला शब्द ‘प्रक्रियेची’ असा हवा. इथेही दोन्ही शब्दांचा अर्थ अगदी भिन्न असल्याने हा दोष लक्षात घेण्याजोगा ठरतो.

**उद्धृते अचूक हवीत**

पृष्ठ १२-१३ वरील कुडाळकर यांच्या लेखाच्या अखेरीस जे संस्कृत वचन उद्धृत केले आहे त्यात ‘शरीरिणाम्’ या शब्दाऐवजी ‘शरीराणाम्’ असा शब्द पडला आहे. संस्कृत वचने उद्धृत करताना ते ते वचन मुळाशी ताडून पाहाणे गरजेचे असते. हे पथ्य खरे तर कोणत्याही भाषेतील उद्धृतांबाबत पाळले गेले पाहिजे.

**‘ललित’ आणि ‘प्रिय रसिक’**

असमर्थनीयरीत्या रूढ केल्या जाणाऱ्या हिंदीचे अनावश्यक आक्रमण दर्शवणारी दोन उदाहरणे:

एक आहे ‘ललित’ मासिकाचा ऑगस्ट ०८चा ‘तेंडुलकर विशेषांक’. त्यातल्या अनुक्रमे विवेक पंडित आणि मेधा पाटकर यांच्या लेखांत (पृष्ठ ९६ व पृष्ठ १०२) ‘पर्दाफाश’ आणि ‘पोलखोल’ असे दोन शब्द आले आहेत. ‘पर्दाफाश’ करण्याऐवजी ‘बुरखा फाडता’ आला असता किंवा ‘बिंग फोडता’ आले असते. ‘पोलखोल’ करायच्या ऐवजी ‘बेंड फोडता’ आले असते! या वेगळ्या शब्दांच्या उपयोजनामुळे भाषेचे सौंदर्य वाढते असेही नव्हे. दोघांना बोलण्यात ते शब्द सरावाचे झाले असावेत व म्हणून लेखनातही सहजपणे उतरले असावेत. (दोन्ही व्यक्ती ‘चळवळी’तल्या आहेत!)

मेधा पाटकरांच्या बाबतीत असे घडत असणे शक्य आहे, की त्यांचा रहिवास हिंदी पट्ट्यात जास्त असल्याने तिथले शब्द त्यांच्या बोलण्या-लिहिण्यात सहजपणे येत असणार. पण हे झाले एक समर्थन. परंतु अपरिहार्य मात्र नव्हे!

'पॉप्युलर' प्रकाशनाच्या वतीने 'प्रिय रसिक' हे त्यांच्या प्रकाशनांविषयी माहिती देणारे नियतकालिक प्रकाशित होते. त्यात संजय मोने यांनी 'पुढली पाने' या सदरात राही बर्वे यांच्याविषयी लिहिलेल्या लेखात 'राहीकडे शब्दांची कमी नाही' (पृ.९) हे हिंदी वळणाचे वाक्य लिहिलेले आहे. केवळ 'कमी' या शब्दाचा उपयोग केल्याने हे घडले आहे. पण त्या जागी 'कमतरता' हा शब्द वापरला की लगेच त्या वाक्याला मराठी डौल येतो की नाही ते पाहा!

**प्रतिसादातील मुद्दे**

माझ्या मागच्या लेखात (ऑगस्ट ०८) कारेकर ह्या वाचकानी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा उल्लेख केला होता. नाटके, दूरदर्शन वाहिन्यांवरील मालिका यांतील संवाद सदोष असतात असा त्यांचा एक मुद्दा आहे. या मुद्द्याचा वेगवेगळ्या अंगांनी विचार करता येईल.

नाटक, मालिका यांची अभिव्यक्ती अनिवार्यपणे संवादांतून होत असते. मुळात तो ललित साहित्याचा भाग आहे. ललित साहित्यातील भाषेचा लवचीकपणा हे तिचे सामर्थ्य असते. नाटक, कथा, कादंबरी यांतून व्यक्तिरेखा उभ्या करायच्या असतात. त्या व्यक्तिरेखा प्रत्ययकारी व्हाव्या लागतात. प्रत्येक व्यक्ती तिच्या स्वत:च्या अशा व्यक्तिमत्त्वाने जगत असते. तिची बोलीभाषा, तिची शारीरभाषा ही खास तिची स्वत:ची असते. त्यामुळे स्वाभाविकच ती व्यक्तिरेखा उभी करताना या गुणविशेषांचा परिपोष लेखक करत असतो. ती त्या लेखनाची अपरिहार्य गरज असते. त्यामुळे त्या लेखनाची भाषा त्या त्या व्यक्तीनुसार राहणे अटळ ठरते. लेखकाच्या प्रतिभेचा गुणधर्म इथे कसाला लागतो. त्यातूनच भाषेची तथाकथित मोडतोड घडते. ते भाषेच्या लवचीकतेचे सामर्थ्य असते, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे लेखकाला त्यापुरते तरी स्वातंत्र्य साहित्यप्रांताने बहाल केलेले असते. म्हणूनच या भाषेकडे काटेकोर शुद्धाशुद्धतेच्या, प्रामादिकतेच्या पलीकडे जाऊन विचार करावा लागतो. मात्र त्याबरोबर हेही खरे, की लेखकाने या स्वातंत्र्याचा निदान भाषेपुरता तरी अतिरेकही करणे योग्य नसते. वाक्यरचनेचे, शब्दांच्या योग्य उपयोजनाचे भान ठेवणेही गरजेचे असते.

**आरत्यांचे उच्चारण – अज्ञान व बौद्धिक आळस**

कारेकरांनी आरत्यांचे उच्चारण अशुद्ध केले जाते असेही निरीक्षण नोंदवले आहे. ते बरोबर आहे, पण त्याचे कारण अगदी साधे आहे. आरत्यांचे उच्चारण परंपरेत सामान्यत: श्रवणाद्वारे व पाठांतरातून होत आलेले असते. आरतीचे लिखित रूप समोर ठेवणे हा त्यावर उपाय आहे. परंतु ते सर्वजण नजरेसमोर ठेवतातच असे नाही. त्यामुळे आरतीच्या रचनेतील नेमक्या व योग्य शब्दरूपांचे ज्ञान अनेकांना नसते. परिणामत: उच्चारांचे अनेकदा चुकीचे 'श्रवण' होते व अज्ञानातून किंवा नेमके रूप जाणून न घेण्याच्या बौद्धिक आळसातून ही चुकीची उच्चारणे होत राहतात व जिभेला तसेच वळण लागते. आपले उच्चारण चुकीचे आहे याचे भानही निर्माण होत नाही.

**पुन्हा वृत्तपत्रे**

मुंबई 'सकाळ'च्या रविवार आवृत्ती-सोबत 'सप्तरंग' ही पुरवणी असते. त्या पुरवणीत 'क्षितिज' या सदरात वृंदा भार्गवे यांचा ''ते लिबरल आहेत(?)'' या शीर्षकाचा लेख आलेला आहे. (४ मे ०८, पृष्ठ १३) त्यात दोन क्रमांकाच्या रकान्यात केशवसुतांचा उल्लेख 'केशवसूत' असा करून त्यांच्या हाती 'सूतगुंडा' दिला आहे! पुढे चौथ्या रकान्यात ''लोकसभा-विधानसभा एकमेकींच्या हातात हात घालून असलेल्या चौका-चौकातल्या सभा असाव्यात असा दृढ समज असणाऱ्या मुलांचं गैरसमज दूर करावं असं वाटून गेलं'' असं सदोष वाक्य आलं आहे. या वाक्यात आलेलं 'गैरसमज' हे पद पुंलिंगी असल्याने ''मुलांचा गैरसमज दूर करावा असं वाटलं'' अशी ही रचना हवी.

पुढच्या रकान्यातल्या शेवटच्या परिच्छेदातलं प्रारंभीचं वाक्य 'आता आपल्याला वाहनांजवळ येऊन त्या साऱ्यांनी एकच गिलका-गिल्ला केला', यात 'आपल्याला' या शब्दाऐवजी 'आपापल्या' असा शब्द हवा. लेखाचा विषय मराठी 'भाषा/साहित्य' (आणि भाषेची मौखिक परीक्षा) असा असल्याने हे रचनादोष दुर्लक्षून कसे चालेल?

४ मे २००८च्या त्याच अंकात 'मुंबईचे उत्पन्न वाढले' या शीर्षकाखालील बातमीच्या उपशीर्षकात '६९ लाखांचे अधिक्य' या पदामध्ये 'अधिक्य' हे चुकीचे रूप वापरले आहे. 'अधिक' हे विशेषण; त्याचे नामरूप 'आधिक्य' असे होते.

**महत्त्वाची बातमी – म्हणूनच बिनचूक हवी**

'लोकसत्ते'च्या ७ मे २००८च्या अंकात (पृष्ठ १) 'स्टेम सेलच्या जागतिक संशोधनाचा बहुमान कोल्हापूरला' या शीर्षकाच्या बातमीतील हे वाक्य पाहा : ''...राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्र, पुणे येथील प्रा. डॉ. रमेश भोंडे यांच्या सहकार्याने त्यांनी केलेल्या संशोधनामध्ये स्त्रीच्या प्रजनन संस्थेत (जेनेटियल ट्रॅक) केवळ स्टेम सेलच्या उपलब्धतेवर शिक्कामोर्तब झालेले नाही, तर या सेल्सचे रूपांतर स्वादुपिंडाच्या इन्सुलिन, मेंदूतील चेतातंतू, यकृत, मूत्रपिंड चरबी इतकेच काय हृदयाच्या पेशी प्रयोगशाळेत यशस्वी रीत्या निर्माण करण्यात त्यांनी यश मिळवले असून या संशोधनाचा उपयोग मानवी शरीराला त्रस्त करणाऱ्या अनेक व्याधींचा

समूळ नायनाट करण्यासाठी होईलच. शिवाय...''

एकच एक मोठे वाक्य लिहिल्याने नेमका आशय समजणे दुष्कर झाले आहे शिवाय वाक्याचा तोलही गेलाच आहे.

स्टेम सेल्स प्राप्त होणे हे मूलभूत संशोधन, हा पूर्वार्ध महत्त्वाचा. त्यातून आणखी काही महत्त्वपूर्ण वैज्ञानिक घटिते प्राप्त झाली हा या बातमीतला उत्तरार्ध आहे. मात्र या दोन्हींची सांधेजोड करताना 'प्रतिनिधी'ची तारांबळ उडाली आहे!

**अशी वाक्यरचना केली तर**

ह्याच वाक्याची, ते दोन-तीन वाक्यांत फोडून पुढीलप्रमाणे रचना केली असती तर डॉ. पत्की व डॉ. भोंडे यांच्या संशोधनाचे महत्त्व वाचकांच्या सुगमपणे लक्षात आले असते : 'राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्र, पुणे या संस्थेतील प्रा. डॉ. रमेश भोंडे यांच्या सहकार्याने त्यांनी हे संशोधन केले. या संशोधनामध्ये स्त्रीच्या प्रजनन संस्थेत (जनायटल ट्रॅक) स्टेम सेल उपलब्ध होतात यावर शिक्कामोर्तब झाले आहे. परंतु केवळ एवढे नाही, तर या सेल्सचे रूपांतर स्वादुपिंडाच्या इन्शुलिनमध्ये करण्यात डॉक्टर पत्कींना यश मिळाले आहे. त्याचप्रमाणे मेंदूतील चेतातंतू; यकृत, मूत्रपिंड, चरबी यांच्या; इतकेच काय पण हृदयाच्या पेशीही प्रयोगशाळेत निर्माण करण्यातही त्यांनी यश मिळवले आहे. त्यामुळे या संशोधनाचा उपयोग मानवी शरीराला त्रस्त करणाऱ्या अनेक व्याधींचा समूळ नायनाट करण्यासाठीही होईल.'' आता 'शिवाय स्त्रीरोग शास्त्रांतर्गत...' हे पुढचे वाक्यही, थोडेसे मोठे असले तरी अर्थ कळायला सुबोध झाले, असे लक्षात येईल.

**लिंग-वचनाचा योग्य वापरही अर्थ स्पष्ट करतो**

'लोकमत'च्या दि. ५ मे २००८ च्या अंकात 'एक्स्प्रेस वे वर टोलसाठी 'स्मार्ट कार्ड'चा वापर' अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे (पृष्ठ २). त्या बातमीतील दोन वाक्ये अशी: 'प्रिपेड स्वरूपाचे हे कार्ड लवकरच दाखल केले जातील. ...कोणत्याही टोल नाक्यावर हे कार्ड उपलब्ध होऊ शकतील.' दोन्ही वाक्यांत कार्ड या शब्दाचा ज्या क्रियापदांशी संबंध आहे (केले जातील, होऊ शकतील) त्यांच्या रूपावरून 'कार्ड' शब्दाचा अनेकवचनी अर्थ अभिप्रेत आहे. 'कार्ड' हे नाम नपुंसकलिंगी असल्याने (ते कार्ड) त्या पदाचे अनेकवचनी रूप 'ही कार्डे' असे दोन्ही ठिकाणी अपेक्षित आहे.

**मुद्रितशोधकाची डुलकी?**

५ मे च्याच 'लोकमत'च्या अंकात 'झिरो अवरमध्ये खासदारांसाठी मोकळे मैदान' या शीर्षकाखालील बातमीची 'कॉपी' पाहताना मुद्रितशोधकाला डुलकी लागली असावी!' '' 'झिरो अवर' संसदेतील 'शून्य प्रहर' नसून खासदार आणि माजी खासदारांसाठी नवी दिल्लीत खासदार आणि माजी खासदारांसाठी असलेल्या 'कॉन्स्टिटच्यूशन क्लब' या मध्यवर्ती स्थळाच्या नव्या जिमचे नाव आहे.'' या वाक्यात 'खासदार आणि माजी खासदारांसाठी' ही चार पदे पुनरावृत्त झाली आहेत!

**मोठ्या टायपातही?**

दि. ५ आणि ६ मे ०८ च्या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील ही सदोष वाक्ये पाहा : 'यंदा मराठीतील सर्वोत्तम कादंबरीस रोख ११ हजार १११ रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे' ('जयवंत दळवी पुरस्कार' ५ मे ०८). वाक्यात 'सर्वोत्तम कादंबरीस' या नंतर 'हा पुरस्कार दिला जाणार आहे' अशी पदे येणे आवश्यक आहे. शिवाय 'रोख' हा शब्द दोनदा आला आहे. तोही लेखनदोषच!

दि. ६ मेच्या अंकात ('ठाणे प्लस'-मध्ये) 'घंटाळी रोडच्या काँक्रिटीकरणाचं कामं होणारं चुटकीसरशी' असं ठसठशीत, जाड टायपातलं सदोष शीर्षक आहे. 'कामं' आणि 'होणारं' या दोन्हींवरील बिंदुचिन्ह अनावश्यक. 'काँक्रिटीकरणाचं' हे रूप एकवचनी. म्हणून 'कामं'मधील अनेकवचन निदर्शक बिंदुचिन्ह नको. 'काम' असा एकवचनी शब्द हवा. 'होणारं'मधील बिंदुचिन्ह तर सर्वथा अनावश्यक.

**'लोकमत'मध्ये सुद्धा!**

लोकमतच्या दि. ५ मे ०८च्या अंकातही एका वाक्यात अशीच 'जाड' चूक आहे! 'निवडणुकीत सत्तेचाळीस उमेदवार एमएमआरडीएच्या रिंगणात' या शीर्षकाखाली चौकटीत जाड टायपात '२६ मोठा नागरी क्षेत्राच्या जागा' अशी पदे आहेत. 'जागा' हे नामपद स्त्रीलिंगी. '२६' व 'मोठी' ही दोन्ही विशेषणे. '२६' अनेकवचनी. म्हणून 'मोठी'चेही अनेकवचनी रूप 'मोठ्या (जागा)' असे हवे.

**डौल बिघडला**

दि. ८ मे ०८च्या 'सकाळ'मधील 'समाजविज्ञान क्षेत्रात डौल मराठी झेंड्याचा!' ह्या बातमीतील दोन वाक्यांचा डौल मात्र बिघडला आहे! वाक्ये अशी आहेत: ''विविध विषयांत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या चोवीस विद्यार्थ्यांना पदके देण्यात आले. त्यामध्ये सहा मराठी मुलांचा समावेश होता. मुंबईचा महेश राजगुरू, गणेश सोडये आणि माधुरी पाटील यांना रौप्यपदक आले.'' या वाक्यांत 'पदके देण्यात आले' या वाक्यांशात नामपद (पदके) अनेक वचनी असल्याने क्रियापदही अनेकवचनी हवे (देण्यात आली.) पुढच्या वाक्यामधून पहिले तिन्ही विद्यार्थी मुंबईचे असल्याचा बोध होतो. त्यामुळे त्यांचे विशेषण अनेकवचनी ('मुंबईचे' असे) हवे.

**संस्कारक्षम भाषिक लेखन**

मुलांसाठी केलेले लेखन असेल, तर त्यातील शब्दरूपांविषयी अधिक दक्ष राहणे

**(पान २८ वर...)**

# 'डायरी'मधून कॅन्सरचा शोध

## डॉ. सुनंदा चावजी

'ग्रंथाली'चे संस्थापक चिटणीस दिनकर गांगल यांनी संपादित केलेली ही 'कॅन्सर डायरी' म्हणजे गांगल यांची स्वत:ची मुलगी अपर्णा गांगल (सांडू) हिला झालेल्या कॅन्सरची व सहा महिन्यांच्या अल्पकाळातच घडून आलेल्या तिच्या दु:खद मृत्यूची शोकांत कहाणी तर आहेच; पण त्यापेक्षा कॅन्सरच्या संदर्भात अजूनही बरंच काही सांगणारी अशी ही 'डायरी' आहे.

स्वत:ने किंवा एखाद्या स्वकीय व्यक्तीने कॅन्सरशी दिलेल्या झुंजीचे वर्णन करणारी अनेक पुस्तके मराठीत प्रसिद्ध झाली आहेत – डॉ. अरुण लिमयेंच्या 'लाखमोलाचा जीव'पासून ते डॉ. अरविंद बावडेकरांच्या 'कॅन्सर – माझा सांगाती'पर्यंत! पण ही सर्व पुस्तके व्यक्तिगत अनुभवापुरती मर्यादित आहेत. 'कॅन्सर डायरी'त व्यक्तिगत अनुभवाला अनेक सामाजिक आयामांची जोड दिल्याने ती वेगळी झाली आहे.

यात सुरुवातीला दिनकर गांगल व अनुराधा गांगल या पतिपत्नींनी आपल्या पस्तीस वर्षे वयाच्या, विवाहित, दोन मुलांची आई असलेल्या, नुकत्याच अमेरिकेहून येऊन बंगलोरला स्थायिक होऊ पाहणाऱ्या अपर्णा या, व्यवसायाने आर्किटेक्ट असलेल्या सुविद्य कन्येला, ध्यानीमनीही नसताना अचानक उद्भवलेल्या ओव्हरीच्या कॅन्सरची कथा सांगितली आहे. निदानापासून अवघ्या सहा महिन्यांच्या कालावधीत तिच्या ओढवलेल्या मृत्यूची, तिच्यावर केल्या गेलेल्या उपचारांची, त्यात आलेल्या अडचणींची, तिला झालेल्या यातनांची ही हृदयस्पर्शी कहाणी आहे.

अपर्णाचा कॅन्सर पहिल्यांदा ओव्हरीमध्ये उद्भवला असला तरी ओव्हरी काढायच्या पहिल्या ऑपरेशनच्या वेळी लिव्हर व आसपासच्या भागातही कॅन्सरची लागण दिसून आली होती. ओव्हरीचाच कॅन्सर लिव्हरमध्ये पसरला आहे (मेटॅस्टॅसिस) का लिव्हर किंवा स्वादुपिंडाचा स्वत:चा



वेगळा कॅन्सर आहे असा प्रश्न डॉक्टरांना पडला. एकाच वेळी दोन अवयवांमध्ये स्वतंत्रपणे कॅन्सरची लागण होणे ही अत्यंत दुर्मीळ घटना असते. त्यामुळे कोणत्या प्रकारची केमोथेरपी द्यावी याचा निर्णय लवकर होत नव्हता. केमोथेरपी देऊनही अपर्णाचा त्रास वाढतच होता. पुन्हा दुसरे मेजर ऑपरेशन करून पोटातील बऱ्याच कॅन्सरग्रस्त टिश्यूज काढून टाकण्यात आल्या. या दुसऱ्या ऑपरेशनच्या वेळी अपर्णाला पित्ताशय–नलिकेचा स्वतंत्र कॅन्सरपण होता हे स्पष्ट झाले. आपल्या पोटातला सगळा कॅन्सर निघाल्याने आता आपण लवकर बऱ्या होऊ असा अपर्णाला व तिच्या आईवडिलांनाही वाटणारा विश्वास पार खोटा ठरला. अपर्णाचा कॅन्सर इतका आक्रमक होता की ऑपरेशननंतर तिचा त्रास वाढतच गेला. प्रकृती अधिकाधिक ढासळत गेली व ११ मे २००५ ला निदान झाल्यापासून सहा महिन्यांनी म्हणजे १६ नोव्हेंबर २००५ रोजी तिची प्राणज्योत मालवली!

गांगल पतिपत्नींनी लिहिलेल्या या पहिल्या प्रकरणानंतर स्वत: अपर्णाने आपल्या आजारपणात लिहिलेल्या डायरीची काही पाने उद्धृत केली आहेत. आपल्या आजारासंबंधी डायरी लिहून मनातल्या भावनांचा निचरा केल्याने फायदा होतो असे अपर्णाने डॉ. बर्नी सीगल यांच्या 'पीस, लव्ह अँड हिलिंग' या पुस्तकात वाचले व म्हणून तिने डायरी लिहायला सुरुवात केली. डायरीच्या प्रत्येक पानापानातून एका तरुण मुलीची – ती पत्नी आहे व आईही आहे – जगण्याबद्दलची तीव्र इच्छा, सकारात्मक वृत्ती, 'या रोगावर मी मात करणारच' ही जिद्द व विलक्षण मनोधैर्य दिसून येते. दुसऱ्यांदा मेजर ऑपरेशन करावे लागणार हे समजल्यावर, एकीकडे मनातून घाबरली असल्याचे कबूल करूनही ती लिहिते– ''मी खूप पॉझिटिव्ह आहे, मला नक्की माहिती आहे की मी यातून बाहेर पडणार आहे. माझ्या बाळांकडे जाणार आहे. माझा जन्म असं मरण्यासाठी झालेला नाहीये.''

एका ठिकाणी ती लिहिते– ''मी कधी कधी कल्पना करते की माझ्या शरीरातल्या पेशी freedom fight करताहेत, १९४२ ची 'चले जाव' चळवळ! त्या malignant cells ना चले जाव म्हणताहेत, "Hopefully they will succeed!" – ''बघू माझी आशा व विलपॉवर जास्त स्ट्रॉंग आहे का माझा आजार!''

आपल्या आजाराची भयावहता माहीत असूनही इतका पॉझिटिव्ह विचार करणारी अपर्णा मनाला खोलवर भिडते.

अपर्णाचे पती जितेंद्र सांडू यांनीही या पुस्तकात एक प्रकरण लिहिले आहे– अपर्णाचे कॅन्सरचे निदान झाल्यावर त्या दोघा पतिपत्नींनी इंटरनेट, पुस्तके, कॅन्सर–

रूग्णांशी, चर्चा, परदेशातील डॉक्टरांशी चर्चा अशा अनेक मार्गांनी कॅन्सरची बरीच माहिती जमवली, तिचे विश्लेषण केले – अर्थात त्यातून एकच निष्कर्ष निघाला की निदान झाले तेव्हाच अपर्णाचा कॅन्सर खूप पुढच्या स्टेजमध्ये होता! आत्यंतिक दु:खाचा व निराशेचा डोंगर कोसळल्यावरही त्यातून वर येण्यासाठी डॉक्टरी उपचारांबरोबर योगिक, आध्यात्मिक आणि चिंतनात्मक उपचारांची कास धरायचे त्या दोघांनी ठरवले असे ते लिहितात. त्यासाठी आधारभूत ठरलेल्या, कॅन्सरवरील होलिस्टिक उपचारांची माहिती देणाऱ्या दोन–तीन पुस्तकांचाही त्यांनी उल्लेख केला आहे.

''या दुर्दैवी घटनेचा दुसऱ्या बाजूने विचार करायचा तर त्या काळात आमच्या सामर्थ्याचा आम्हाला नव्याने साक्षात्कार झाला. आपण एरवी असे थकेपर्यंत आपली ताकद पणाला लावतच नाही. आपल्या शरीरात संकटसमयी वापरण्यासाठी एवढी ऊर्जा असते याचा आपल्याला पत्तादेखील नसतो! या संकटाने आणखी एक गोष्ट घडली ती म्हणजे मी व माझी मुले खूप जवळ आलो. माझे कुटुंबीय, मित्र यांचा अपार पाठिंबा, प्रेम व मदत आम्हाला झाली'' – अशा शब्दांत जितेंद्र सांडू त्या दुर्दैवी अपघाताची सकारात्मक बाजू मांडतात, ती उल्लेखनीय आहे.

या पुस्तकात पाच–सहा कॅन्सररुग्णांनी किंवा त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी सांगितलेल्या त्यांच्या कॅन्सरच्या कहाण्या आहेत– कॅन्सर कसा डिटेक्ट झाला, कशी व कुठे ट्रीटमेंट झाली, काय अडचणी आल्या, कोणी मदत केली, शेवटी रूग्ण मरण पावला किंवा आता सध्या ठीक आहे – अशा ठरावीक साच्यातील या कहाण्या आहेत, पण त्यातून या भयानक आजाराची कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक बाजू समजायला मदत होते.

या पुस्तकातील तीन महत्त्वाची प्रकरणे डॉक्टरांनी लिहिलेली आहेत. त्यांपैकी पहिले प्रसिद्ध मानसोपचारतज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी लिहिले आहे. त्यात त्यांनी कॅन्सर होण्याच्या प्रक्रियेचा व कॅन्सरसाठी कारणीभूत घटकांचा सोप्या भाषेत उहापोह केला आहे. त्यांच्या मते, कॅन्सरची प्रत्येक केस ही स्वतंत्र केस असते आणि प्रत्येक व्यक्तीमध्ये कॅन्सरचा आजार कसे वळण घेईल हे सर्वस्वी त्या व्यक्तीच्या जडणघडणीवर, रोगप्रतिकारक शक्तीवर (Immune system) अवलंबून असते. अगदी मर्यादित उपचार घेऊन किंवा अजिबात उपचार न घेताही अनेक कॅन्सरग्रस्त रूग्ण बरीच वर्षे जगतात आणि योग्य वेळी व पुरेसे उपचार घेऊनही काहीजण लवकर मृत्युमुखी पडतात. म्हणून डॉ. नाडकर्णी म्हणतात, ''सर्व अंदाज चुकवणाऱ्या कॅन्सरच्या या स्वायत्ततेचा संबंध शेवटी त्या व्यक्तीच्या जैवशास्त्रीय–जनुकीय आखणीत असावा. तेव्हा रुग्णाला काय काय होऊ शकेल याची जाणीव करून देता येऊ शकते, पण शंभर टक्के यशाची किंवा अपयशाचीही खात्री देता येत नाही ही या दुखण्याची मोठी शोकांतिका आहे. कॅन्सरचा रूग्ण डॉक्टरला विचारतो–

''Doctor doctor will I die?
Yes my child & so will I!''

तेव्हा कॅन्सरचे उपचार कसे असावेत हे सूत्ररूपाने डॉ. नाडकर्णी असे सांगतात (अर्थात ही मते सर्वच डॉक्टरांना मान्य होतील असे नाही)

– कॅन्सरचे निदान झाले आहे पण कॅन्सर प्रक्रियेमुळे कोणताच त्रास होत नसेल तर कोणतेही उपचार करू नयेत.

– कॅन्सरवर उपचार करताना रुग्णाला अधिकच आजारी बनवतील अशा उपचारपद्धती वापरू नयेत.

– अनावश्यक शस्त्रक्रिया रुग्णावर लादू नयेत.

– कॅन्सरसह अनेक वर्षे जगता येते. जर शांत कॅन्सर जागा झाला व खूपच त्रास देऊ लागला तरच उपचार करावेत व या उपचारांचे साध्यसुद्धा केवळ palliation म्हणजे त्रासमुक्ती एवढेच असावे!

असेच काहीसे मत गांगलांचे फॅमिली डॉक्टर डॉ. प्रकाश तामणे यांनी 'डिवचलेला वाघ' या लेखात मांडले आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत रोगी आला तर शस्त्रक्रियेचा फायदा होऊ शकतो, पण थोडच्या अॅडव्हान्स स्टेजमधल्या रूग्णाचे ऑपरेशन करणे म्हणजे झोपलेल्या वाघाला डिवचून अधिक आक्रमक बनवण्यासारखे आहे असा त्यांचा चाळीस वर्षांच्या वैद्यकीय व्यवसायाच्या अनुभवातून निघालेला निष्कर्ष आहे. रुग्णाच्या आप्तस्वकियांनी दिलेला मानसिक आधार व पाठबळ हाच सर्वात महत्त्वाचा उपचार आहे असेही ते म्हणतात.

डॉ. वासंती गोडसे या आयुर्वेदतज्ञांनी आयुर्वेदातील कॅन्सरची संकल्पना व आयुर्वेदिक उपचारपद्धतीने होणारे फायदे याबाबत लिहिले आहे. त्यांच्या लिहिण्याचा सारांश एवढाच आहे, की आयुर्वेदीय चिकित्सेने कॅन्सर रुग्ण बरा होत नसला तरी त्याची भूक व वजन सुधारणे, लक्षणे कमी होणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे व एकंदरीत quality of life सुधारणे यासाठी हे उपचार उपयुक्त ठरतात.

अपर्णावर शस्त्रक्रिया करणारे व प्रथमपासून तिला उपचारांबाबत मार्गदर्शन करणारे गॅस्ट्रोएण्टरॉलिस्ट सर्जन डॉ. आनंद नांदे यांच्या 'श्रद्धा विज्ञानावर' या लेखात त्यांनी अपर्णाच्या सकारात्मक व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे व आणखी एक–दोन महत्त्वाच्या मुद्यांना हात घातला आहे. ते लिहितात–

''डॉक्टरांनी रोग्याला त्याच्या आजाराचे खरे स्वरूप सांगावे की नाही याबाबत नेहमीच वाद केला जातो. याचे उत्तर सोपे नाही. काही रुग्णांना सत्य कितीही कठोर असले तरी ते मला समजले पाहिजे असे वाटते. पण तसे ते सांगितल्यावर बरेचसे रोगी अत्यंत

निराशाग्रस्त व हताश होऊन लवकर मृत्युमुखी पडल्याचे दिसून येते. त्यामुळे अनुभवांती मला असे वाटते, की रोग्याला सत्य स्थिती सांगणे हे क्रूरपणाचे आहे. त्यामुळे रोग्यापुढे मी फक्त पॉझिटिव्ह गोष्टी मांडून त्याकडे जास्त लक्ष द्यायला सांगतो व नातेवाईकांपैकी एखादी जबाबदार, समतोल वृत्तीची व्यक्ती निवडून तिला सत्य स्थिती सांगतो व रोग्याला कधी व कसे सांगायचे हे तिच्यावर सोडून देतो!'' इंग्लंडमध्ये उलटे आहे. आधी रुग्णाला विश्वासात घेऊन आजाराची पूर्ण कल्पना दिली जाते व मग त्याच्या संमतीने इतर नातेवाईकांना त्याच्या आजाराबद्दल सांगितले जाते.

डॉ. नांदे यांनीही कॅन्सरची कारणे, उपचार व त्यांना मिळणारा प्रतिसाद हा व्यक्तिसापेक्ष असतो असेच मत व्यक्त केले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राशिवाय इतर उपचारपद्धती प्रभावी असतीलही, पण त्या वैज्ञानिक कसोटीला उतरल्या तरच त्यांचा अवलंब करणे इष्ट असा इशाराही ते देतात. अपर्णाबरोबर डॉ. नांदे यांचे डॉक्टर-पेशंट एवढेच नाते राहिले नव्हते तर आपुलकीचे भावबंधही जुळले होते. त्यामुळे ते म्हणतात, की डॉक्टर हा वरवर निर्विकार दिसला तरी अशा एखाद्या रुग्णाच्या यातना व मृत्यू पाहून संवेदनाशील डॉक्टरच्या मनाचा एक कोपराही कुठेतरी मृत पावत असतो!

या पुस्तकातला एक अत्यंत महत्त्वाचा लेख म्हणजे स्वत: दिनकर गांगल यांनी लिहिलेला 'कॅन्सर जाणून घ्यावा' हा, कॅन्सरच्या विविध पैलूंची सविस्तर चर्चा करणारा लेख!

घरातल्या एखाद्या व्यक्तीला कॅन्सर झाला तर कोणकोणत्या समस्या उद्भवतात, मानसिक आघात, दु:ख, निराशा यांबरोबरच आर्थिक बोजा, सतराशेसाठ तपासण्या, त्यासाठी करावी लागणारी धावपळ, 'टाटा कॅन्सर'सारख्या प्रचंड पसारा असलेल्या हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी 'वेटिंग लिस्ट'मध्ये राहवे लागणे यांसारख्या गोष्टींचा रुग्णाला व नातेवाईकांना खूपच त्रास- शारीरिक व मानसिक - होतो. अनेक परिचित व नातेवाईक विविध उपचार सुचवतात - तमक्या वैद्याच्या औषधाने फलाण्याचा कॅन्सर ठणठणीत बरा झाला, वाराणशीला अमुक माणूस रामबाण औषध देतो, तिकडे जाऊन पाहा इत्यादी. सांगणाऱ्याचा हेतू चांगला असतो, पण त्यात सत्याचा अंश फारसा नसतो व त्या सर्व उपचारांची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची, त्यांना वैज्ञानिक पुरावा आहे की नाही हे पाहण्याची रुग्णाची वा त्यांच्या नातेवाईकांची मनस्थिती नसते. अशा वेळी या पुस्तकातील विविध दृष्टिकोन हे त्या रुग्णास व त्याच्या नातेवाइकांस मार्गदर्शक ठरू शकतील असे गांगल सुचवतात.

'होलिस्टिक ॲप्रोच' ही एक नवी संकल्पना कॅन्सरच्या उपचारांसाठी वापरण्यात येत आहे - यात आधुनिक उपचारांच्या जोडीला आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, निसर्गोपचार, योग्य, अध्यात्म अशा सर्व मार्गांनी कॅन्सरशी लढा देणे अभिप्रेत आहे. अशा प्रकारचे उपचार राबवणाऱ्या डेहराडून, राजकोट इत्यादी ठिकाणच्या काही संस्थांची माहितीही गांगल यांनी दिली आहे.

कॅन्सर होण्यामागे बाह्य वातावरणा-तील प्रदूषण, हानिकारक द्रव्ये, अन्नातील भेसळ हे घटक जसे कारणीभूत आहेत त्याचप्रमाणे आपल्या शरीरांतर्गत मानसिक तणाव, भावनांचे उद्रेक, निराशा, वैफल्य, नकारात्मक विचारसरणी याही गोष्टी आपली रोगप्रतिकारक शक्ती खच्ची करत असतात त्यामुळे कॅन्सर उपचारांत या सर्व बाबींचा विचार व्हायला हवा.

आणखीही अनेक बाबींचा या पुस्तकात उहापोह आहे, पण ते सर्वच इथे मांडणे शक्य नाही.

हृदयस्पर्शी पण तितकेच उद्‌बोधक असे हे पुस्तक नक्कीच वाचनीय आहे.

**(नागपूर येथील 'माग्रस' मंडळाच्या बैठकीत वाचलेला अभिप्राय)**

---


**डॉ. सुनंदा चावजी**
**एल २३, यशवंतनगर,**
**नागपूर १०**
**फोन : २२४१४३३**



**॥ग्रंथाली॥**



**कॅन्सर रोगाविषयीची समज वाढवणारी आणि तसे करता करता मानवी जीवनाची सखोलता प्रकट करणारी दोन पुस्तके एकशेऐंशी रुपयांत घरपोच!**



**कॅन्सर डायरी** – *संपादक दिनकर गांगल*
*१५० रु.* ***सवलतीत ९० रु.***

**गुडबाय कॅन्सर** – *विद्या मुडगेरिकर*
*१००रु.* ***सवलतीत ६० रु.***

# साहित्य वाचून मी घडलो!

## – राजदत्त

**रघुवीर कुल –** इ.स. १९८५ साली मी एक चित्रपट करत होतो. त्याचा सेट फिल्मसिटी येथे लागला होता. नाना पाटेकर, निळुभाऊ फुले वगैरे नटमंडळी उपस्थित होती. तिथं राजदत्तही आलेले होते. त्यांच्या नेहमीच्या झब्बा, धोतर अशा वेषात ते होते. माझ्या शेजारी अनुपम खेर होते. ते म्हणाले, ''ये आदमी कौन है?'' मी म्हटलं, ''ये राजदत्त, फिल्म डायरेक्टर है।'' त्यावर खेर म्हणाले, ''ये डायरेक्टर लगते नही है।'' त्यांच्या डोळ्यांसमोर डायरेक्टरची प्रतिमा वेगळ्याच ड्रेसमधली होती. मी त्यांची राजदत्तांशी ओळख करून दिली. राजदत्त–विषयी असंच कुतूहल आपल्या मनात असतं. ते शमलं तर ही मुलाखत कृतार्थ झाली असं मी समजेन!

धामणगाव–वर्धा जिल्ह्यात लहानसे गाव. या गावातील दत्ता मायाळू 'राजदत्त' कसे झाले? या नावाची काय कथा आहे?

**राजदत्त –** मी विदर्भातला. 'सिनेमा पाहणं' इतकाच तेव्हा सिनेमाशी संबंध होता. त्या क्षेत्रात आपण जावं असं मनात आलं नव्हतं. तशी परिस्थितीही नव्हती. मी दैनिक 'भारत'मध्ये काम करत होतो. 'पुण्याला आलो आहोत तर शिकावं नवीन काहीतरी' असा विचार करून राजाभाऊ परांजपे यांच्याकडे गेलो. त्यांना म्हटलं, ''तुमच्याकडे शिकायला यावं असं मला वाटतं. माझी अपेक्षा काहीच नाही. रात्री येत जाईन मी.'' राजाभाऊ म्हणाले, ''कुठल्या गाढवानं सांगितलं तुला की शुटिंग रात्री असतं म्हणून?'' मी म्हणालो, ''कुठल्या गाढवानं नाही सांगितलं. माझं मलाच वाटलं.'' कुठलंही चित्रपटविषयक स्वप्न त्या काळात माझ्या मनात नव्हतं. तोच मी एका चित्रपटाचं दिग्दर्शन करतो! मला खरंच वाटत नाही, हा सगळा प्रवास कोणामुळे झाला? हे माझ्या गुरूंचं, राजाभाऊंचं श्रेय आहे. त्यांच्यामुळे मी इतका उभा राहिलो. कृतार्थतेची, श्रद्धेची भावना मनात आली. म्हणून राजा



परांजपेंमधला 'राज' आणि माझ्या दत्तात्रेय नावातील 'दत्ता' असं हे राजदत्त नाव मी स्वत:ला लावलं.

**रघुवीर –** आपण मद्रासमध्ये 'चांदोबा'चं काम करत होतात. हे कसं काय घडून आलं?

**राजदत्त –** ते सांगण्यासाठी मला खूप मागे जावं लागेल. मी वर्ध्याला असताना आमच्या शाळेची ट्रिप, जवळच असलेल्या दगडाच्या खाणी पाहायला गेली होती. त्या

**'ग्रंथाली'च्या वतीने प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सायंकाळी ६ ।। वा. इंडियन एज्यु. सोसायटीच्या शाळेत एका जीवनसफल मान्यवर व्यक्तीची मुलाखत होते. ऑगस्टमध्ये चित्रपट दिग्दर्शक राजदत्त यांची मुलाखत कलावंत रघुवीर कुल यांनी घेतली. हे मुलाखतमालेचे चौथे पुष्प.**

काळात आतासारखी यंत्रं नव्हती. लिफ्ट नव्हती. उताराची एक वाट असायची, त्यातून आत जायचं. दिवसासुद्धा पूर्ण अंधार असायचा. पलिते असायचे. त्यातून मार्ग काढत गेलो. तिथं काम करणारी माणसं पाहिली. बाहेर आल्यावर आम्ही मुलं एकमेकांकडे पाहून हसू लागलो. कारण चाचपडत जाताना हात बाजूला टेकल्यामुळे हाताला कोळशाचं काळं लागलं आणि श्वास घ्यायला जड जायचं म्हणून हात आपोआप तोंडाकडे जायचा, त्यामुळे तोंडही काळं झालं. आधी कोणालाच कळलं नाही, की आपणच आपल्या तोंडाला काळं फासलं आहे! मला थोडासा ब्राँकायटिसचा त्रास होता. तो तिथं वाढला. माझी थुंकीही काळी झाली होती. माझ्या मनात आलं, इथं काम करणाऱ्या या माणसांची कधी वैद्यकीय तपासणी होत नसेल. त्या काळात युनियन नव्हत्या. बारा–बारा तास काम करायचं. मजूर होते म्हणून पगार मिळत होता, इतकंच!

शिक्षकांनी आम्हाला ट्रिपविषयी निबंध लिहायला सांगितला. मी निबंधात त्या मजुरांविषयी लिहिलं. नंतर शिक्षक, निबंधाची तपासलेली वही एकेकाला देत होते. मला त्यांनी समोर बोलावलं व मुलांसमोर निबंध वाचायला सांगितला. शिक्षक कसे असतात, आपण त्यांच्याकडून कसे शिकत जातो, बघा. त्यांनी माझ्या निबंधाबद्दल मुलांना कौतुकाचे शब्द सांगितले. इतकंच नाही तर तो लेख त्यांनी नागपूरच्या 'तरुण भारत'च्या कार्यालयात पाठवला. माडखोलकरांच्या सहीचं पोस्टकार्ड मला आलं, की 'नागपूरला आल्यावर मला भेट.'

रेल्वे माझ्या बापाचीच होती, म्हणजे

माझे वडील रेल्वेत होते! त्यामुळे मी लगेच जाऊन त्यांना भेटलो. ते म्हणाले, ''तुझे विचार चांगले आहेत. तू लिहीत राहा.'' मी थोडासा लिहीत राहिलो, अर्थात निबंधच! पुढे मॅट्रिक झाल्यावर मी त्यांना भेटलो व सांगितलं, की ''मला वर्तमानपत्रात काम करण्याची इच्छा आहे.'' मी माडखोलकरांचे लेख वाचत असे. त्यांचा 'आषाढस्य प्रथम दिवसे...' हा लेख मला खूप आवडला. त्या वयात कालिदासांपेक्षाही तो चांगला वाटला होता, कारण संस्कृत व मराठी यांपैकी मराठी समजण्याची कुवत माझ्याकडे होती. माडखोलकरांनी विचारलं, ''तू आता काय करतोस?'' मी म्हटलं, ''आमच्या गावात कॉमर्स कॉलेज आहे. तिथंजातो.'' ते म्हणाले, ''तू 'युनिव्हर्सिटी' या सदरात लिहीत जा.''

मी चार वर्षं लिहीत राहिलो. बी.कॉम. झालो आणि कृतार्थ झाल्यासारखं वाटलं. थोडं समाधान वाटलं. पुन्हा त्यांच्याकडे गेलो व सांगितलं, ''मला वर्तमानपत्रांच्या क्षेत्रातच करियर करायचं आहे.'' ते म्हणाले, ''इथं काही जागा नाही.'' पण मग काहीतरी आठवलं त्यांना! मला म्हणाले, ''पुण्याला दैनिक 'भारत' म्हणून वर्तमानपत्र निघतं, तिथं जागा आहे. मी पत्र देतो. ते घेऊन तू तिथं जा.'' पुण्यात आल्यानंतर माझ्या वैदर्भीय भाषेचा जो आनंद मला पुणेकरांनी दिला, तो सहन करत करत मी राहिलो. वर्षभरातच 'भारत' बंद पडलं.

नंतर माडखोलकरांनी सांगितलं, ''मद्रासला 'चांदोबा' मासिकासाठी त्या कार्यालयात एक जागा आहे, तिथं तू जा.'' त्यांनी परस्परच मद्रासला तसं पत्र पाठवलं. 'चांदोबा'मध्ये माझं नाव जरी संपादक मंडळात असलं तरी माझं काम ट्रान्सलेटरचं होतं. मी तिथं काम करू लागलो, पण माझी अस्वस्थता वाढली. तिथं शिस्त कडक होती. सकाळी नऊ वाजता जायचं ते संध्याकाळ-पर्यंत थांबावं लागं. पैसे पुण्यापेक्षा जास्त मिळत होते पण मन अस्वस्थ होतं. वाचन चालू होतं. पुण्याला 'इंटरनॅशनल'मध्ये वाचायला मिळतं म्हणून काही दिवस तिथं नोकरीही केली होती. वाचन हाच माझा आनंद होता.

**हू वॉज मोअर राइट? टिळक की आगरकर? या प्रश्नाचे उत्तर काळानंच दिलं आहे!**

तिथंच राजाभाऊ परांजपे यांची भेट झाली. त्यांचं 'बाप-बेटे' चित्रपटाचं चित्रीकरण तिथं चालू होतं. एक वर्षभर मी त्यांच्याकडे जात होतो. 'चांदोबा'च्या संपादकांनी मला सांगितलं होतं, ''तुझं काम तू नीट जबाबदारीनं करणार असशील तर दिवसा नाही आलास तरी चालेल.'' त्यामुळे मला मोकळीक मिळाली. चांगली माणसं होती. एक-दीड वर्षांनंतर राजाभाऊ म्हणाले, ''इथं पैसा बराच मिळतो, पण नको तो मला. माझे मराठी चित्रपट आपले बरे. मी आता पुण्याला जातो. तू येतोस का?''

अचानक, हा प्रश्न माझ्यासमोर आला. 'काय करावं, इथं पगार बरा आहे. स्वास्थ्य आहे' असंही एकीकडे वाटत होतं. राजाभाऊंनी स्पष्ट सांगितलं होतं, की तुला शिकायला म्हणून मी नेतो. तुला काही पगार देऊ शकणार नाही. तुला खर्चायला माझ्या खिशातून थोडे पैसे देईन. वडिलांना हे सगळं लिहून विचारलं, 'काय करू? सोडू का?' वडिलांनी लिहिलं, 'मी अजून निवृत्त झालेलो नाही. त्यामुळे तुझ्याकडून मला अपेक्षा नाही. पण माझ्याकडून तुझी काही अपेक्षा असेल तर ती काही पूर्ण होणार नाही.'

माझी आणखी एक मानसिकता होती. मी संघ स्वयंसेवक होतो. एक संघ स्वयंसेवक आणि पुढे सरसंघचालक झालेले अप्पाजी जोशींनाही मी पत्र लिहून विचारलं, 'मी या क्षेत्रात जाऊ का? पत्रकारितेचं क्षेत्र सोडून चित्रपटक्षेत्रात मी जावं का?' त्यांचं पत्र आलं, 'कोणत्याही क्षेत्रात जायला काय हरकत आहे? आपण संघ स्वयंसेवक आहोत हे विसरू नये म्हणजे झालं.' त्यातून माझा मी निर्णय घेतला. मी इकडे आलो. राजाभाऊंबरोबर पुन्हा सुरुवात केली ती 'मधुचंद्र' चित्रपटापर्यंत.

**रघुवीर –** 'मधुचंद्र' हा चित्रपट खूपच गाजला. तो यशस्वी झाला म्हणून तुम्हाला वाटलं, की निर्मात्यांची रांग आपल्याकडे लागेल पण तसं काही झालं नाही असं तुम्ही म्हणालात.

**राजदत्त –** हो, तसं झालं खरं! लग्न झालं होतं. जबाबदारी वाढली होती. 'मधुचंद्र' चित्रपट खूप चालला, पण नंतर आठ-दहा महिने काहीच काम नव्हतं. हे सोडून द्यावं आणि पोटापाण्यासाठी दुसरं काहीतरी करावं असं वाटू लागलं. ही गोष्ट मी राजाभाऊ व सुलोचनाबाई यांच्याकडे बोलून दाखवली. ते म्हणाले, ''असं काही करू नको. थोडे दिवस वाट पाहा.'' सुलोचनाबाई म्हणाल्या, ''तुम्ही कोल्हापूरला जा बाबां-कडे. मी त्यांच्याकडे बोलते.'' मी कोल्हापूरला भालजींकडे गेलो. त्यांना म्हटलं, ''मला पैशांची फार गरज आहे. मला सहाय्यक म्हणून घ्या. जे पैसे द्याल ते मी घरी पाठवीन. मी इथं स्टुडिओत राहीन.'' त्यांनी ते मान्य केलं नाही. ते म्हणाले, ''कुठल्याही परिस्थितीत मी तुला माझा सहाय्यक म्हणून घेणार नाही. तू पुन्हा सहाय्यक झालास तर या क्षेत्रातील माणसं तुला कधीच चित्रपट देणार नाहीत.'' मी म्हटलं, ''मी जगू कसा?'' ते म्हणाले, ''तू माझ्याकडून पैसे घेऊन जात जा.''

असे पैसे घेणं मला पटलं नाही. मी परत जायचं ठरवलं. पुन्हा रात्री त्यांचा निरोप आला. ''तू जाऊ नकोस.'' त्यांना भेटल्यावर म्हणाले, ''मी तुला काही काम देतो. कपाटात माझ्या फायली आहेत. त्या तू वाच. कारण मी काय लिहिलंय ते मला आता आठवत नाही. तू त्या वाचून, त्यावर टिपणं काढून

मला वाचायला दे.'' शंभर-दीडशेच्या वर फायली होत्या. मी त्या वाचायला सुरुवात केली. महिन्या-दीड महिन्यांनी त्यांनी विचारलं, ''कोणतं स्क्रिप्ट आवडलं तुला?'' अमुक एक मला आवडलं नाही असं मी भालजींना सांगणं शक्यच नव्हतं. तितका उद्धटपणा माझ्या स्वभावात नाही. म्हटलं, ''सगळी चांगली आहेत.'' पुन्हा म्हणाले, ''पण तुला कोणतं स्क्रिप्ट आवडलं ते सांग.'' मी म्हणालो, ''हे 'घरची राणी' स्क्रिप्ट छान आहे.'' त्यांनी विचारलं, ''का?'' मी म्हटलं, ''ह्यात इतिहास, ऐतिहासिक सत्पात्रं, ध्येयं, नाटक... असं काहीच नाही. साधी सरळ कथा आहे ही.''

भालजी म्हणाले, ''तुला आवडली? मग तू कर.'' मी मनातल्या मनात टुणकन उडी मारली. प्रत्यक्षात त्यांच्यासमोर बसायचीसुद्धा आमची पद्धत नव्हती. मी तो चित्रपट केला. महाराष्ट्र शासनाचं त्याला बक्षीस मिळालं. पुन्हा बाबांकडे गेलो. नमस्कारासाठी वाकलो तर मला म्हणाले, ''मला नमस्कार करू नको.'' मी म्हटलं, ''का? दिग्दर्शक मी असलो तरी कथा तुमचीच आहे.'' त्यावर बाबा म्हणाले, ''नाही, नाही. त्याचं क्रेडिट लताबाईंना आहे. त्यांना नमस्कार कर. तू जेव्हा माझ्याशी बोलून परत गेलास तेव्हा लताबाईंनी पन्नास हजाराचा चेक माझ्या हाती देऊन सांगितलं, की ' ''ह्या मुलाला तुम्ही एकतरी चित्रपट द्या.' ''

त्यानंतर माझा सुखाचा नसला तरी आनंदाचा प्रवास सुरू झाला. लताबाईंच्या स्वभावाचा हा वेगळा पैलू मी अनुभवला आहे. तो आज प्रथमच सांगत आहे.

**रघुवीर –** 'घरची राणी' नंतर तुम्ही 'अपराध', 'देवमाणूस', 'झेप', 'वऱ्हाडी वाजंत्री' वगैरे चित्रपट केलेत. त्या चित्रपटांशी संबंधित असलेले माडगूळकर, शंकर पाटील, राजा परांजपे, मिरासदार यांच्या काही आठवणी सांगाल? चित्रपट आणि साहित्य हा तुमचा जिव्हाळ्याचा विषय आहे.

**राजदत्त –** साहित्यिक हाही माणूसच आहे. आपल्याला ती माणसं खूप मोठी, वेगळी वाटतात, पण तीही आपल्यासारखी असतात. ती भांडतात, चेष्टामस्करी करतात, टिंगलही करतात. पण चित्रपटात साहित्यिकांनी म्हणजे व्यंकटेशदादांनी, मिरासदारांनी काम करणं हे वेगळं होतं. त्यात वेगळी भावना होती.

**मला दिग्दर्शनासाठी चित्रपट मिळावा म्हणून लताबाईंनी गुपचूप पन्नास हजार रुपये दिले होते, हे भालजींनी मला त्या चित्रपटास पुरस्कार मिळाला तेव्हा सांगितलं!**

माडगूळकरांना एक मोठा सांसारिक शॉक बसला होता. आपण फार मोठा, चांगला जावई मिळवला आहे अशा आनंदात ते होते. जी स्वप्नं त्यांनी पाहिली होती त्यापेक्षा अधिक आर्थिक सुबत्ता होती, अशा ठिकाणी आपली मुलगी सुखी झाली आहे असं त्यांना वाटत होतं, पण तो जावईच गेला होता! ते फारच अस्वस्थ होते. तेव्हा माझ्या मनात अशी कल्पना आली, की अण्णा इथंच राहिले तर येणारी माणसं त्याच विषयावर बोलणार, त्या आठवणींनी त्यांना आणखी त्रास होणार म्हणून अण्णांना इथून दुसरीकडे न्यावं. माझ्या 'वऱ्हाडी वाजंत्री'चं शुटिंग व्हायचं होतं. त्यांनीच ती कथा लिहिली होती. धारिष्ट्य करून मी अण्णांना म्हटलं, '' 'वऱ्हाडी वाजंत्री'चं शुटिंग आहे. तिथं तुम्ही चला ना, त्यातला कर्नाटकी मनुष्य तुम्हीच रंगवा. तुम्ही कराल का ते काम? सर्वांनाच बरं वाटेल. तुम्हालाही मोकळं वाटेल.'' अण्णा म्हणाले, ''विचार करण्यासारखं आहे.''

मी ताबडतोब माझी सायकल घेऊन व्यंकटेश, मिरासदार, शंकर पाटील यांच्याकडे गेलो. त्यांना म्हटलं, ''अण्णा शुटिंगला येताहेत. तुम्हीही चला. छोटेमोठे रोल करा. आम्ही काही त्यांना आनंद देऊ शकणार नाही. तुम्ही असलात तर ते जमेल.'' हे सगळ्यांना पटलं.

ते सर्वजण स्टुडिओतच राहत. तिथंच रात्री मैफिल बसायची. मी अस्वस्थ होत असे. वाटे, 'रात्रीचे दोन वाजले, खूप गोष्टी अजून करायच्या आहेत. जेवणं व्हायची आहेत. सकाळी शुटिंग आहे. कसं होणार सगळं?' या विचाराने मी बेचैन होत असे. कारण वेळेबाबत मी फार पर्टिक्युलर आहे. मी ठरलेल्या वेळेपेक्षा दोन तास आधीच सेटवर हजर असे. नऊची शिफ्ट असेल तर मी नेहमी सात वाजता येतो, कारण ते दोन तास फार महत्त्वाचे असतात. दिग्दर्शकाला आपल्या विचारांना पूर्ण रूप देणं त्यावेळी जमतं. त्याप्रमाणे त्या दिवसांतही मी दोन तास आधी असायचो. कधी कधी, अण्णा उशिरा येत किंवा शंकर पाटील रात्रीच सांगायचे, की मी सकाळी नऊ वाजता येणार नाही. मग त्याप्रमाणे मी शॉट उशिरा ठेवत असे. पण सगळं वातावरण खेळीमेळीचं असे. या लोकांचं छान दडपण घेत, त्यांच्याबरोबर आनंद घेत आम्ही हा चित्रपट पूर्ण केला.

**रघुवीर –** पुन्हा तुम्ही के. बालचंद्र यांच्याकडे गेलात आणि 'या सुखांनो या' हा चित्रपट केलात. त्यानंतर आला तो 'देवकीनंदन गोपाला'. त्यात श्रीराम लागू होते. त्या चित्रपटातील एका सीनमध्ये, एका गाण्यात लहान मुलं घोंगडीखाली उभी आहेत. त्यांनी काठीनं घोंगडी वर उचलली आहे. करंगळीवर कृष्णानं डोंगर उचलला आहे आणि त्याखाली हे बालगोपाल उभे आहेत असा आभास निर्माण करणारा तो सीन होता. चित्रिकरणात अशी काही इमेजेस आवर्जून वापरलीत का?

**राजदत्त –** मला वाटतं, चित्रपट हे माध्यम एखाद्या भाषेतून सांगावं असं नाही. भाषेचा उपयोग दुय्यम आहे. संहिता लिहिलेली असते हे खरं. चित्रकाराच्या मनात

एक चित्र तयार असतं. त्यातील रेषा, रंगसंगती वगैरे सगळं त्याला आत कुठेतरी जाणवत असतं. ते तसं जाणवल्यानंतरच त्याचं कॅनव्हासवर काम सुरू होतं. चित्रपटाचं तसंच आहे. दिग्दर्शन याचा अर्थ केवळ काही कलावंतांकडून काम करवून घेणं एवढाच नसतो. त्यापेक्षा खूप अधिक काहीतरी आहे. ते एक पूर्ण चित्र आहे. आपल्या मनातले भाव शब्दांशिवायही कसे सांगता येतील असा विचार करणं हे खरं दिग्दर्शन असं मला वाटतं. नाहीतर संवाद लिहिलेलेच असतात.

माझ्या वडिलांचीच गोष्ट आहे. प्लाझावरून चित्रपट पाहून आम्ही दोघं चाललो होतो. त्यांना नाटकाची फार आवड होती. सिनेमा ते फारसा पाहात नसत. त्या दिवशी त्यांनी मला विचारलं, ''ही कथा कोणाची?'' मी म्हटलं, ''प्रभाकर ताम्हाणेंची.'', ''गीतकार कोण?'' ''माडगूळकर.'' ''संगीत कोणाचं?'' ''एन. दत्तांचं'' अशी प्रश्नोत्तरं आमच्यात झाली. त्यानंतर मी त्यांना संकलन, पटकथा वगैरे काय असतं ते सांगितलं. मग त्यांनी विचारलं, ''सगळे तुझ्याशी का हातमिळवणी करत होते? सगळे तुझी का स्तुती करत होते? सगळ्यांनी हे असं असं केलेलं आहे, मग तू काय केलंस?'' मला याचं उत्तर देता येत नव्हतं. दिग्दर्शक म्हणजे नेमका काय असतो याचं उत्तर मला अजूनही सांगता येणार नाही.

**रघुवीर –** आपण तुमच्या सामाजिक जाणिवांकडे येऊ या, पण त्याच्या आधी 'शापित'संबंधी बोलू. 'शापित' हा वेठबिगारीवर आधारित होता. ती गोष्ट ठरवून घेतलीत का?

**राजदत्त –** नाही नाही. तो चित्रपट बराचसा तयार झालेला होता. एके दिवशी बाबुजींचा फोन आला, की देशपांडे आजारी आहेत, म्हणून तू हा चित्रपट पूर्ण कर. चित्रपट थोडासाच करायचा राहिला होता. मी आलो. जो नेमका एक सीन होता त्याबद्दल देवळकरांशी बोललो. मी त्यांना म्हटलं, ''मी देशपांड्यांना भेटून त्यांच्याशी बोलतो. त्यांच्या मनात कसं आहे तसं करतो.'' देवळकर म्हणाले, ''तसं नको, तुम्हाला कसं वाटतंय ते सांगा.'' मी म्हटलं, ''मला हे बरोबर वाटत नाही.''

**खैरलांजीचे गुन्हेगार समाजात उजळ माथ्याने कसे वावरू शकतात? ही गोष्ट मला अस्वस्थ करते.**

तो सीन असा होता– तिला ज्यावेळी कळतं, की पहिल्या रात्री आपर्लीया अंथरूणावर आलेला माणूस हा, तिनं ज्याच्याशी लग्न केलं तो नव्हता; ज्यांनी त्यांचं लग्न जमवलं तो मालक होता – ती मुलगी जीव द्यायला जाते. बाकीचे नोकर तिला वाचवतात. निळुभाऊ फुलेंनी ते काम केलं आहे. ते तिला सांगतात, ''हे आपलं प्राक्तन आहे. असंच जगावं लागतं.'' – त्यानंतर ती आपल्या झोपडीत जाते. तिथं तो नवरा बसलेला असतो, अस्वस्थपणे. मला सीनमधील या टिप्स बरोबर वाटत नव्हत्या. झोपडीत गेल्यावर ती ''माझ्याकडे काय बघताय? आपलं लगीन झालं आहे ना?'' वगैरे कसं बोलेल? असं होईल का? मला ते योग्य वाटेना. मी विचारलं, ''मी हा सीन केला तर चालेल?'' त्यांनी होकार दिल्यावर मी तो सीन केला, जसा त्या चित्रपटात आहे.

– तो झोपडीत आहे. 'माझ्या पत्नीला मी वाचवू शकलो नाही' म्हणून त्याला गिल्टी वाटत आहे व त्याच्या पत्नीला वाटतं, की 'खरंच याचं काय चुकलं? हेच आपलं प्राक्तन आहे.'

**शनिवार, २० सप्टेंबर**
**सायं. ६ ।। वा.**
**मुलाखत – वसंत सरवटे**
**प्रश्नकर्ते – अवधूत परळकर, प्रशांत कुळकर्णी**
इं. एज्यु. सोसायटी, बाबरेकर मार्ग,
गोखले रोड (द.), दादर, मुंबई ४०० ०२८

एकही शब्द न वापरता तो दोन–तीन मिनिटांचा सीन आम्ही केला. तो सर्वांना जाणवला. फोटोग्राफरनंही त्याचं काम चांगलं केलं. सगळ्या युनिटचंच चांगलं सहकार्य मिळालं. फोटोग्राफरसुद्धा कथेत इन्व्हाल्व व्हावा लागतो. मला आनंद झाला.

दिग्दर्शकाच्या स्वत:च्या काही मर्यादा असतात. दुसरा कोणी करेल तसंच माझं असेल असं नाही. माझी पद्धत वेगळी असेल. त्या त्या कथेसाठी माझी स्वत:ची पद्धत असायला हवी असं मला वाटतं. या गोष्टी मला साहित्यानं दिल्या. साहित्यानं मला घडवलं. मी खूप वाचलेलं आहे. आजही वाचतो. चित्रपटक्षेत्रातही साहित्याची आवड असलेली माणसं आहेत, पण साहित्यिक आजही आमच्याकडे अस्पृश्यभावानं बघतात. चित्रपटातही साहित्य असतं हे कोणी समजून घेत नाही. त्यामुळे त्यावर नीट परीक्षणं नाहीत. कोणीतरी परीक्षणं लिहिणारा नेहमी सिनेमाला जातो. आर्टिस्टनं कसं काम केलं आहे वगैरेबद्दल लिहितो. साहित्याचा अंश असल्याशिवाय कलाकृती मोठी होऊ शकत नाही, पण साहित्यिक हे मानायलाच तयार नाहीत.

वाचनसंस्कृती–तूनच समाजाचं उत्थापन होऊ शकेल असं मला वाटतं. 'ग्रंथाली'ची 'ग्रंथयात्रा' होती तेव्हा मी आपणहून त्यात विदर्भात सहभागी झालो. गांगलांशी माझी मैत्री झाली. हे काहीतरी चांगलं करत आहेत. आपलाही हातभार लागावा असं वाटून मी गेलो. आम्ही मोठमोठ्या पिशव्या घेऊन गावोगाव गेलो, पण साहित्यिकांना आमच्या क्षेत्राबद्दल काही जाणीव नाही ही खंत मनात आहे.

**रघुवीर –** तुमचे चित्रपट अनेक आहेत. वेगवेगळ्या विषयांवर आहेत. 'पुढचं पाऊल' हा 'हुंडाबळी' विषयावर आहे.

आता तुम्ही खैरलांजीवर चित्रपट करताय. त्याशिवाय तुमचा संस्कारभारती चळवळीशीही संबंध आहे. त्या अनुषंगानं काही सांगावं. 'पुढचं पाऊल'मध्ये प्रतीक म्हणून 'बंडा'चा एक हात होता.

**राजदत्त** – प्रतीकाचा अर्थ ज्याचा त्याने शोधावा, लावावा. तो निर्मात्याने सांगायचा प्रयत्न करू नये. विशेषत: चित्रपटाशी संबंधितांनी तर हे पथ्य पाळावं असं मला वाटतं. आपण जे केलेलं आहे त्याचा अर्थ आपण आधीच सांगतो; ठसवण्याचा प्रयत्न करतो आणि मग तो चित्रपट दाखवतो. हे बरोबर नाही. लोकांना पाहू दे. त्यांना अर्थ काढू दे. आपण फक्त आपल्या मनाशी ताडावं की मला जो अर्थ अभिप्रेत आहे तो पोचला आहे का? नसेल तर मी कुठे कमी पडलो हा विचार करायला पाहिजे. 'पुढचं पाऊल'च्या वेळी सेन्सॉरनी आम्हाला विचारलं होतं, ''तुम्ही शिवसेनेचे सैनिक आहात का? हा हात शिवसैनिकाचा वाटतो.'' असाही अर्थ काढला जाऊ शकतो.

खैरलांजीची घटना क्रूर आहे. त्याविषयी फार बोलावं असं नाही. ज्या संस्कृतीचा आणि पाच हजार वर्षांपूर्वीच्या परंपरेचा अभिमान आपण बाळगतो तिथं ही घटना घडू शकते?... पण घडलेली आहे. खैरलांजी गाव असं आहे की जिथं एकही ख्रिश्चन किंवा मुस्लिम घर नाही. सर्व हिंदूच आहोत. त्यांच्याही चुका असू शकतील पण त्यांना हा अधिकार कोणी दिला? ते उजळ माथ्यानं कसे राहू शकतात? या विचारातून विषय माझ्यासमोर आला. तो स्पष्ट पण प्रतीकात्मक पद्धतीनं मी मांडला आहे. तिथं तेरा माणसं पकडली गेली. त्यातले सहा जण जामिनावर सुटले आहेत. उरलेले सात कदाचित निर्दोष सुटतील आणि या चित्रपटाचं काय होईल? मला गुन्हेगारांची नावं देता येत नाहीत. मी कॅन्व्हिन्सही करू शकत नाही, पण मी ते करणार आहे, प्रतीकात्मक करणार आहे. कारण मी स्वत: वैयक्तिक जीवनात बांधिलकी मानतो.

समाजाला जागं करण्याचं, आनंद देण्याचं माझं प्रथम कर्तव्य आहे. तो देता देता काही सांगता आलं तर बघावं. हे सहजपणानं, सौम्यपणानं करावं असं मला वाटतं. माझ्यासमोरचे आदर्श पुरातन आहेत. एकनाथांचा, ज्ञानेश्वरांचा आदर्श माझ्यासमोर आहे. ज्ञानेश्वरांनी एवढं मोठं ज्ञान दिल्यावर त्यांनी नामदेवांबरोबर सहा वर्षं प्रवास केला.

**साहित्यिक आमच्याकडे अस्पृश्य भावानं पाहतात; चित्रपटांतही साहित्य असतं हे कोणी जाणत नाही.**

स्वत: लिहिलेल्या ग्रंथाबद्दल बोलता आलं असतं, पण हा प्रवास सर्वसामान्य माणसाच्या जवळ जाण्याचा होता, त्याला समजण्याचा होता. तिथं ते ज्ञान उपयोगी पडू शकत नव्हतं. त्याच ज्ञानदेवांनी नंतर गवळणी लिहिल्या. जे साध्या माणसाला समजेल त्या भाषेत काहीतरी देण्याचा प्रयत्न केला. तसाच प्रयत्न एकनाथांनीही केला. आपण तसाच प्रयत्न करावा असं मला वाटतं. त्यांच्याइतकं ज्ञान, विद्वत्ता नसेल माझ्याकडे, पण तरीही प्रयत्न करावा या विचाराचा मी आहे.

**रघुवीर** – 'संस्कारभारती'चं काम हे चित्रपटक्षेत्रापेक्षा वेगळं आहे. तो विचार कसा आला?

**राजदत्त** – कालपरत्वे आपण थोडे आऊटडेटेड होत जातो. त्यामुळे गेली दहा-पंधरा वर्षं माझ्याकडे चित्रपट नाहीत. घरात स्वस्थ बसणं शक्य नव्हतं. आपण कुठेतरी गुंतलेलं राहवं असं वाटत होतं. 'संस्कार-भारती' ही अशी संस्था आहे, की जी कलामाध्यमात काही करू इच्छिते. अशा ठिकाणी काम करावं असं वाटलं. तिची तत्त्वंही बरी वाटली. शेवटी, सर्व कलांचा अर्थ सर्व समाजाला एकत्र आणणं, भेदभाव विसरणं हाच आहे. पंचवीस वर्षांपूर्वीची संस्था आहे. हरीभाऊ वाकणकरांनी ती स्थापन केली.

जे चाललं आहेत ते आपल्याला थोपवता येत नाही, पण कलेमध्ये आपण तो सगळा भाग का आणावा? जे चांगलं आहे, नीट आहे ते लोकांना द्यावं, त्या लोकांना एकत्र आणावं असं त्यांचं उद्दिष्ट होतं. चार वर्षांपूर्वीपासून आम्ही काही उत्सव करतो. एक जानेवारी हाच नववर्षदिन असं समाजात ठसलं आहे, पण गुढीपाडवा ही चैत्रप्रतिपदा आहे. त्यालाही काही अर्थ आहे. ते पुन्हा रुजवावं म्हणून बनारसला व इतर काही गावांत आम्ही त्या दिवशी पहाटे कार्यक्रम करतो. काही वर्षांनंतर आमच्या एक लक्षात आलं, की बनारसलाच का? ब्रह्मपुत्रेच्या काठी, गोहातीमध्ये का नको? नंतर गोहातीला तसा कार्यक्रम केला. वैजयंतीमाला आल्या होत्या. तेथील लोक आम्हाला म्हणाले, ''आप हिंदुस्थानसे आये....'' मला आश्चर्य वाटलं. असं का? आसाम, अरुणाचल हे हिंदुस्थानात नाही का? याचं विश्लेषण आपण करायला हवं. आपण एखाद्या सुटीत आसाम, अरुणाचल येथे जायचं ठरवतो का? दोष आपलाही आहे. हे समाजाला आपणच सांगितलं पाहिजे.

कलेच्या माध्यमातून 'संस्कारभारती' या संस्थेद्वारा हे काम होतं. आमच्या कार्यक्रमाला त्या सात राज्यांतून सोळा गट आले होते. त्यांना आम्ही वेगवेगळ्या प्रांतांत नेलं. रांगोळी, चित्रकला या कला सर्वत्र समान आहेत. अशी ही चळवळ आहे. यात मी स्वत:ला गुंतवून ठेवतो. मी त्यातून मोठा, कृतार्थ झालो असं नाही, पण काहीतरी करत आहे. थोडंसं समाधान वाटत आहे.

**रघुवीर** – आपण 'गोट्या', 'सावरकर', 'मर्मबंध' अशा मालिका केल्यात. त्या साहित्यावर आधारित होत्या. आताच्या मालिकांमध्ये जे काही जीवघेणं चालू आहे त्यात आपण काही करू शकतो असं वाटतं का?

**राजदत्त** – माझ्या बालपणी मी 'गोट्या' वाचलं होतं. ती मालिका करायचं ठरवल्यावर पुन्हा वाचलं. ना.धों. ताम्हनकर हयात नव्हते. किर्लोस्करवाडीच्या त्यावेळच्या माळरानात त्यांना कुठे दिसला असेल गोट्या? कसा सुचला असेल? त्यांच्या नात्यात असेल का तसा कोणी? असे प्रश्न मनात उभे राहिले. ताम्हनकरांच्या पत्नी ठाण्यात होत्या. त्यांना भेटलो आणि माझ्या मनातले प्रश्न त्यांना सांगितले, पण त्या म्हणाल्या, ''राजदत्त, तुम्ही चुकीच्या माणसाला प्रश्न विचारलात. ते साहित्य लिहीत पण त्याबद्दल माझ्याशी कधीच चर्चा करत नसत. याबाबतीत मी त्यांच्या खिजगणतीतही नव्हते. आमटीत मीठ कमी पडलं तर त्याविषयी मात्र बोलणं व्हायचं. साहित्याबद्दल कधीच नाही.'' म्हणजे तोही मार्ग खुंटला. मग माझा मीच विचार करत राहिलो. एक दिवस लक्षात आलं, की इ.स. १९२० मधलं हे श्रीकृष्णाचंच रूप आहे! त्यातून तो गोट्या, ती सून राधा अशी पात्रं खुलत गेली.

'मर्मबंध' मालिका माझ्याकडे आली. आमच्या घरातील वातावरण टिळकवादी होतं. आगरकरांना कोणी फारसा मान देत नव्हतं. मी विचार करू लागलो. स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षं होत आली. आता मी मालिका करत आहे. आता याचा अर्थ काय होतो? हू वॉज मोअर राईट, टिळक ऑर आगरकर? काळानंच उत्तर दिलं आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या समाजात सुधारणा करता येतील हे मत बरोबर ठरलं का? तसं काहीच घडलं नव्हतं. समाज होता तिथंच राहिला. मग मला टिळकांचा जो अभिमान होता तो डळमळला. सामाजिक सुधारणावादी महत्त्वाचे वाटले. मी निर्मात्यांना म्हणजे पवारांना म्हटलं, ''तुम्ही टिळकांचं काम करत आहात पण माझा फोकस आगरकरांवर आहे. ते व्यक्तिमत्त्व अधिक लोभस वाटतं, त्याची उकल मी अधिक करणार आहे. हवं तर तुम्ही ते काम करा.'' अर्थात त्यांनी तसं काही मानलं नाही. त्यांनी टिळकांचंच काम केलं. कथा समोर आल्या-नंतर कलाकृती करताना त्यातील मर्म ओळखून त्याच्यामागे आपला निश्चित विचार असला पाहिजे असं मला दिग्दर्शक म्हणून वाटतं.

आता आजच्या मालिकांबद्दल बोलतो.

या मालिकांमधून काही मिळतं न मिळतं हे बाजूला ठेवलं तरी निदान त्यामधून समाधान होतं का, एंटरटेनमेंट होते का? हा विचार करायला हवा की टीव्ही पाहिल्या-

## 'सावरकर' चित्रपटामधून मी बाहेर पडलो, कारण...

शिवाय जेवण जात नाही, म्हणून टीव्ही लावायचा! आजच्या सिरियल्सबद्दल मी समाधानी नाही हे खरं आहे आहे, पण हे असं का होतं? याचाही विचार करावा लागतो. चित्रपटसृष्टीत एकेकाळी निर्मात्यांची कथेशी आणि व्यवसायाशी बांधिलकी होती. नंतर सारं बदलत गेलं, त्याच्यामागे आर्थिक कारणं आहेत. आर्थिक नाडी ज्या निर्मात्याच्या हातात आहे. त्याची बांधिलकी कथावस्तूशी, कलाकृतीशी न राहता त्यातून मिळणाऱ्या पैशांशी झाली तेव्हा परवड सुरू झाली.

तीच गोष्ट मालिकांच्या बाबतीत घडली. टीव्ही मालिकांमध्ये पूर्वी निर्मात्यांचा स्वत:चा खर्च व्हायचा. जाहिरातींचा वरचष्मा नव्हता तोपर्यंत मालिका नीट होत्या, ठीक होत्या. आज तिथं माफियांचं साम्राज्य आहे. त्यामुळे हे सारं घडत आहे.

**प्रेक्षकाकडून प्रश्न** – हिंदीमध्ये काही करावंसं वाटलं नाही का?

**राजदत्त** – मी 'दूरियाँ' नावाचा हिंदी चित्रपट केला व त्यावेळी तिथला अनुभव घेतला. आता जसे मालिकांना सात-आठ दिग्दर्शक असतात तसं मला हिंदीमध्ये तेव्हा जाणवलं. तिथं मला स्वतंत्रपणा मिळत नव्हता, म्हणून मी हिंदीत राहिलो नाही. मी मराठी चित्रपट काढतो म्हणजे भाषा मराठी असते, पण ती भाषा न येणाऱ्यालाही तो चित्रपट कळावा अशी माझी भूमिका असते. जो कोणी प्रेक्षक समोर असेल त्याला ती कथा समजली पाहिजे. मला जेव्हा इंग्रजी समजत नव्हते तेव्हासुद्धा चार्ली चॅप्लिनचा चित्रपट मला कळत असे, तसाच मराठी न जाणणाऱ्या प्रेक्षकालाही तो कळला पाहिजे.

**प्रेक्षकाकडून प्रश्न** – 'सावरकर' चित्रपटाच्या वेळी आरंभी आपण व विश्राम बेडेकर होतात. नंतर आपण त्यातून माघार घेतलीत. बाबुजींशी काही मतभेद झाले का?

**राजदत्त** – आजही व्यक्ती आणि कलावंत म्हणून मला बाबुजींबद्दल आदर आहे. मी ज्यावेळी दिग्दर्शक असतो तेव्हा मी स्वत:ला सर्वेसर्वा समजतो. त्यात उद्धटपणा, बेपर्वाई असं काही नसतं. बाबुजींना त्यांच्या पद्धतीनं सावरकर दिसत होते आणि मी तसे दाखवावे असं त्यांना वाटत होतं, पण ते मला मान्य नव्हतं.

'माझी जन्मठेप'मध्ये सावरकरांनी एक प्रसंग लिहिला आहे. एक कैदी ज्याला वॉर्डन म्हटलं जातं. तो एका कैद्याचं जानवं तोडतो. त्याला विरोध होतो. सावरकरांनी त्या विरोधाला पाठिंबा दिला. त्या लोकांनी उपवासही केला. तो प्रसंग मी वाचला होता. पण बेडेकर तो प्रसंग स्क्रिप्टमध्ये घालतील असं मला वाटलं नव्हतं. मी त्यांना संतुलित विचारांचे साहित्यिक मानत होतो. म्हणून मी बेडेकरांना प्रश्न केला, ''अहो, १९९० साली आपण काय दाखवणार आहोत? किर्लोस्कर-मध्ये सावरकरांनी काय लेख लिहिला? रूढी-परंपरेमध्ये ते अडकलेले नव्हते असं दाखवणार ना? हे जर असं दाखवणार आहोत तर हा सीन असावा का? त्यात विचारांची एकसंधता राहील का?'' त्यावर बाबुजी फटकन म्हणाले, ''हे ठरवणारे तुम्ही कोण? तुम्हाला काय करायचंय?'' मी म्हणालो, ''असं नाही जमणार!'' आणि मी ते सोडून आलो.

माझे आणि बाबुजींचे संबंध अतिशय चांगले होते. माझ्या लग्नाच्या वेळी ते सकाळी येऊ शकले नाहीत, पण ते संध्याकाळी आले. कोणाच्याही लग्नात न गाणारे बाबुजी माझ्या लग्नात गायले. पण दिग्दर्शक आणि निर्माता हा संघर्ष उत्पन्न झाल्यावर मला त्यांच्या मताप्रमाणे वागता येईल असं नव्हतं, म्हणून मी विनम्रपणे बाजूला झालो. त्यानंतरही आमचे संबंध मित्रत्वाचेच होते.

**प्रेक्षकाकडून प्रश्न –** 'तुकाराम' विषयावर तुम्ही काम करत होतात. तो चित्रपट करू शकला नाहीत याबद्दल दुःख वाटत असेल ना?

**उत्तर –** 'प्रभात'चा 'तुकाराम' हा रेकॉर्ड ब्रेक होता, तो मी अगदी लहानपणी, आईचं बोट धरून जाऊन पाहिला. त्यानंतर थोडा मोठा झाल्यावर पाहिला आणि दिग्दर्शक झाल्यावरही पाहिला. त्यावेळी माझी मानसिकता थोडी बदललेली होती. काही गोष्टी मला बरोबर वाटत नव्हत्या. पागनीसांनी तुकारामाचं काम चांगलं केलं आहे. सर्वांनी त्यांना 'तुकाराम' म्हणून स्वीकारलं आहे, पण माझ्या मनात पहिला प्रश्न आला, की तुकाराम इतका सुरेख, देखणा असेल का? दुसरा प्रश्न असा, की 'भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे माथी हाणू काठी ।।' असं म्हणणारा मनुष्य खरोखर भोळाभाबडा असेल का? तो जर जगाला हे सांगतो तर स्वतःच्या जीवनात का नव्हता तसा? म्हणजे ते चित्रही खोटं आहे.

तुकारामाचा मृत्यू कशामुळे झाला असावा याबाबत मी तर्क लावू लागलो तेव्हा मला वाटलं, की हा इतका भोळसट होता का की कागद बुडवले म्हणजे साहित्य, ज्ञान बुडतं असं त्यानं मानलं. उलट तो त्या पंडितांना म्हणाला असेल, ''अरे गेला उडत तुम्ही! टाका बुडवून. लोकांच्या तोंडी गेलेलं आहे ते कसं काढता येईल?'' तुकाराम तेरा दिवस उपास करत बसेल? विमान येऊन त्याला स्वर्गात घेऊन जाईल? हे बरोबर नाही. मग नेमकं काय झालं असेल? इथंच विचारांची दिशा बदलते. तुकारामाच्या बाजूचे लोक खवळले असतील. म्हणाले असतील, ''तुम्ही पंडित तरी आहात का? कोण तुम्ही? आम्ही लिहायचं नाही असं सांगणारे तुम्ही कोण?'' त्याचवेळी महाराष्ट्रात एक संघर्ष उभा राहिला असता. लोक चारी बाजूंनी येताहेत. ज्ञानेश्वरांबरोबर 'तुकाराम महाराज की जय' असा घोष करत आहेत. ते पाहून तुकारामांना भीती वाटली, की लोक मला देवत्व देतील! देव करतील. या अभंगांतून मी जे सांगत आहे ते हे लोक जीवनात आणणार नाहीत. लोकांनी मला देवत्व देणं यातच माझा अंत आहे. आता पुढे काय?.... अशा काही कल्पना मी मनात घेतल्या होत्या. तसा चित्रपट करणार होतो, पण ते नाही घडलं.

**प्रश्न –** तुम्ही तत्त्वासाठी चित्रपट बनवलेत, पैशांकडे फारसं पाहिलं नाहीत. आमची पिढी मानत आली आहे, की दत्ताजी बॅलन्स्ड दिग्दर्शक आहेत. चित्रपट आणि मालिकांच्या क्षेत्रात आपली कन्या भक्ती मायाळू काम करतात. त्यांनी संकलित केलेली एखादी सिरियल तुम्हाला आवडली नसेल तर तुम्हा दोघांमध्ये संवाद काय होतो?

**राजदत्त –** ती संकलक म्हणून काम करते. ती दिग्दर्शक नसते, पण चर्चा मात्र आवर्जून करतो. त्यातून तिनं काय घ्यावं हा तिचा मुद्दा आहे.

**(शब्दांकन – शर्मिला पिटकर)**

---

**(पान १८ वरून...)**

त्यांच्यावर शब्दरूपांचे संस्कार जाणीवपूर्वक करता येतात, तसे ते कळत-नकळत सुद्धा होत असतात.

'मुंबई सकाळ'च्या 'स्मार्ट सोबती' पुरवणीत 'कवितेचे झाड' या सदरात सरिता पदकी यांच्या बडबड गाण्यांचं सौंदर्य उलगडून दाखवणारा एक लेख (८ मे ०८, पृष्ठ २) प्रसिद्ध झालेला आहे. त्यातील शेवटच्या परिच्छेदात 'अशा या बदकाचे पिवळे पिवळे चोच, पाय क्वॅक क्वॅक असं गाणं गाणारं बदक मुलांना कसं झॅक झॅक वाटतं, असं त्या सांगतात', असं एक वाक्य लेखिकेनं लिहिलं आहे. वाक्यातल्या 'चोच' या स्त्रीलिंगी शब्दाचं विशेषण 'बदकाचे पिवळे पिवळे' असं नपुंसकलिंगी उपयोजलं आहे, ही चूक आहेच. पण त्याहीपेक्षा चिंत्य बाब म्हणजे वाक्यरचनेत अतिशय भोंगळपणा आहे. वाक्याची सुरुवात करताना विधानाचा रोख 'चोच' या कर्तृपदाकडे जातो; मात्र मध्येच 'गाणारं बदक' असं वेगळंच कर्तृपद येत रचनेचा तोलच बिघडतो. ह्याच वाक्याची रचना 'असं हे पिवळ्या पिवळ्या चोचीचं नि पायांचं आणि क्वॅक क्वॅक गाणं गाणारं बदक मुलांना कसं झॅक झॅक वाटतं, असं त्या सांगतात' अशी केली तर वाक्याचा अर्थबोध पटकन होतो असं लक्षात येईल.

**बोटचेपेपणा? की मुर्दाडपणा?**

पूर्वीच्या एका लेखात (लेखांक २) उल्लेख केलेल्या एका मुद्याचा लेखाच्या शेवटी परत एकदा उल्लेख करतो. आपल्या मुर्दाड आणि उच्चभ्रूंच्या उद्दाम वृत्तीची ती खूण मला वाटते म्हणून.

'लोकसत्ता'च्या ११ मे ०८च्या अंकात 'पेडर रोड येथे आता भुयारी मार्गाचा पर्याय विचाराधीन', या शीर्षकाची बातमी प्रसिद्ध झाली आहे. (पृष्ठ ३) 'प्रतिनिधी'ला 'पेडर रोड'चा 'डॉ. गोपाळराव देशमुख' मार्ग होऊन कित्येक वर्षे झाली हे ज्ञात नाही? की हा मराठी मनाचाच मुर्दाडपणा? की उच्चभ्रूंच्या उद्दाम सुरात सूर मिसळण्याची बोटचेपी वृत्ती?

**जयवंत वसंत चुनेकर**
अहमद सेलर बिल्डिंग, बि.क्र. ८
खोली क्र. २७, स.मो. जाधव मार्ग,
नायगाव, दादर, मुंबई ४०००१४
दूरध्वनी : २४१३५२७४
भ्रमणध्वनी : ९९६९०३१९३५